मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) येथे चौपाटीवर मोठ्या प्रमाणावर खर्च करुन चौपाटी विकसित करण्यात आलेली आहे. सदर ठिकाणी नव्याने मैदाने तयार होत असून सदर मैदाने भाड्याने देण्याबाबत मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०४/२००७, ठराव क्र. ०३ अन्वये नियम ठरविण्यात आले होते. सदर ठिकाणी सद्यस्थितीत कार्यक्रमाकरीता रु. १०००/- प्रतिदिन भाडे आकारण्यात येते. सदर ठिकाणी महानगरपालिकेमार्फत करण्यात येत असलेला खर्च व होणाऱ्या कार्यक्रमाचे स्वरुप पहाता सदर ठिकाणी असलेली मैदाने रु. ५,०००/- प्रति दिन प्रति मैदान या दराने भाड्याने देण्यास व रु. १०,०००/- अनामत रक्कम घेण्यास तसेच संबंधितांनी काही नुकसान केल्यास त्याची रक्कम देखील वसूल करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर ठिकाणी सध्या तयार करण्यात येत असलेले मैदान फक्त मुलांना खेळण्याकरीता ठेवावे. मैदान वापरण्याकरीता दिलेल्या परवानगीच्या एक दिवस अगोदर मंडप असल्यास त्याचे काम सुरु करावे. त्यापेक्षा आधी कामास सुरुवात केल्यास मंजूर दराने भाडे आकरण्यात येईल.

सुचक :- श्री. अनिल सावंत **अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो**

ठरावाच्या बाजुने	ठरावाच्या विरोधात	तटस्थ
१) श्री. दिनेश नलावडे	१) श्रीम. वर्षा भानुशाली	निरंक
२) श्री. अनिल दिवाकर सावंत	२) श्री. प्रविण पाटील	
३) श्री. याकुब इस्माईल कुरेशी	३) श्री. मदन उदितनारायण सिंह	
४) श्री. जुबेर इनामदार		
५) श्री. चंद्रकांत मोदी		
६) श्री. चंद्रकांत म्हात्रे		
७) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद		
८) श्री. बर्नड डिमेलो		
९) श्रीम. निर्मला सावळे		
१०) श्रीम. सुधा व्यास		

ठराव बहुमताने मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.२८/०५/२०१०

प्रकरण क्र. (१५) :- भाईंदर (प) शाळा इमारतीवर शेड बांधणे व मिरारोड उर्दू शाळा सुरू करणे करीता बांधकाम खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

ठराव क्र. (१३) :-

भाईंदर (प) येथे महानगरपालिकेची शाळा गृह इमारत असून सदर इमारतीच्यां टेरेसवर लिकेज आहे. सदर इमारतीवर त्याकरीता शेड बांधण्याची मागणी शिक्षण विभागाने केली आहे. सदर शाळा क्र. ३१ मध्ये नैसर्गिकरित्या वाढ झाल्याने वर्ग कमी पडत असून शेड बांधल्यास त्यामध्ये तात्पुरत्या स्वरूपात वर्ग सुरू करता येईल. त्याकरीता रू. १८,४३,७००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

तसेच मिरारोड येथे उर्दू शाळा सुरू करावयाची मागणी असून तात्पुरत्या स्वरूपात प्रभाग कार्यालय सुरू असलेल्या इमारतीत पहील्या मजल्यावर जागा उपलब्ध असल्याने सदर ठिकाणी ५ वर्गाकरीता बांधकाम केल्यास शाळा सुरू होउु शकेल. त्याकरीता रू. ६,४९,५००/- एवढा खर्च अपेक्षित आहे.

वरील दोन्ही कामे करण्यासाठी तरतूद उपलब्ध आहे. तरी सदर खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री याकूब कुरेशी

अनुमोदन :- निर्मला सावळे

28-05-2010

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. २८/०५/२०१०

प्रकरण क्र. १६ :- मिरारोड येथील रक्तपेढीसाठी आलेले निविदांचे दर मंजूर करणेबाबत.

(मा. सभापतींच्या आदेशाने सदरचा विषय तहकुब करण्यात आला.)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २६/०५/२०१०

प्रकरण क्र. (१७) :- निविदांना मान्यता देणे बाबत.

ठराव क्रमांक (१४) :-

अ.क्र.	कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव	अंदाजित खर्च / दर
१	भाईंदर (प) येथे फाटक रस्त्यावरील दुल्हन महल अपार्टमेंट ते नगरभवन पर्यंत गटार तयार करून फुटपाथ तयार करणे.	रू.३८,०१,२००/-
	अ) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन	३.०० % जास्त दराने
	ब) मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन	**९.०० % कमी दराने**
२	भाईंदर (पूर्व) खारीगांव सत्यनारायण मंदिरा जवळ नाट्य रंगमंच बांधणे. (नगरसेवक निधी)	रू.२८,३९,०००/-
	अ) मे. एकता कंन्स्ट्रक्शन	२०.०० % जास्त दराने
	ब) मे. ललित एन्टरप्राईजेस	१४.९० % जास्त दराने
	दरवाटाघाटीनंतर	**९.९० % जास्त दराने**
३	भाईंदर (प) भगतसिंग गार्डन मधील कबाना तयार करणे. (फेर निविदा)	रू.१०,००,००० /-
	अ) मे. कलाकृती	रू. १०,५०,०००/-
	दरवाटाघाटीनंतर	**रू. ९,८०,०००/-**
	ब) मे. श्रध्दा एन्टरप्राईजेस	रू. १२,१०,०००/-
	क) मे. शिल्पयान	रू. १०,७८,०००/-
४	मिरारोड एन.एच. हायस्कूल नाका ते रसाझ पर्यंत रस्ता उंच करणे.	रू.४९,४०,०००/-
	अ) मे. एम.एस. एन्टरप्राईजेस	**१४.०५ % कमी दराने**
	ब) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रक दराने

५	आरक्षण क्र. ३२६, ट्रक टर्मिनल या जागेत प्रादेशिक परिवहन कार्यालयास प्रशिक्षणासाठी दोन रूम बांधणे. **मे. अनिश मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.**	रु. १४,७४,५०० /- **अंदाजपत्रक दराने**
६	मा. स्थायी समिती सदस्य व अधिकारी यांचा अंदमान निकोबार येथे अभ्यास दौरा आयोजित करणे. **अ) मे. पिरॅमिड ट्रॅव्हल्स** ब) मे. फ्लॅग ट्रॅव्हल सर्व्हीस क) मे. सड्र्स द ट्रॅव्हल	रू. १७,३८,०००/- **रू. ७९,०००/- प्रती नग** रू. ८४,५००/- प्रती नग रू. ८०,४००/- प्रती नग

वरीलपैकी अ.क्र. १ च्या कामी मे. गुरूजी कंन्स्ट्रक्शन कं. यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा १.०० % कमी दराची निविदा, अ.क्र. २ च्या कामी मे. ललित एन्टरप्राईजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ९.९० % जास्त दराची निविदा, अ.क्र. ३ च्या कामी मे. कलाकृती यांची रू. ९,८०,०००/- रकमेची निविदा, अ.क्र. ४ च्या कामी मे. एम.एस. एन्टरप्राईजेस यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा १४.०५ % कमी दराची निविदा, अ.क्र. ५ च्या कामी जिल्हामजूर सोसायटी यांनी शिफारस केलेली मे. अनिश मजूर कामगार सहकारी संस्था मर्या., यांची अंदाजपत्रक दराची निविदा, अ.क्र. ६ च्या कामी मे. पिरॅमिड ट्रॅव्हल्स यांची रू. ७९,०००/- प्रति नग दराची निविदा यांना मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री सुबोध इनामदार अनुमोदन :- श्रीमती हेलन गोविंद

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २९/०५/२०१०

प्रकरण क्र. :-(१८) मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या कामाचे अवलोकन करणे.

ठराव क्र. (१९)

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या खालील कामांना मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजित खर्च	ठेकेदाराचे नांव	मंजूर दर
१	भाईंदर (प) वॉर्ड क्र. ३२ मध्ये विविध गल्ल्यांना पेव्हरब्लॉक बसविणे व तुटलेल्या गटारांवर नविन स्लॅब टाकणे.	रू. ९,९५,०००/-	मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
२	उत्तन कुंभारवाडा येथे जेरल डिसुजा घर ते मुख्य गटारावरील सी.सी. गटार बांधणे.	रू. २,१९,६७५/-	मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
३	भाईंदर (प) नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानात पाण्याची टाकी बांधणे.	रू. ३,०१,३००/-	मे. राकडबाव मजूर कामगार सहकारी संस्था मर्या ता. शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
४	घोडबंदर रेतीबंदर अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करून पेव्हर ब्लॉक बसविणे.	रू. ७,१७,६००/-	मे. श्रीरंग मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता.मुरबाड, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
५	भाईंदर (पूर्व) विभागातील गटारावरील आर.सी.सी. स्लॅब दुरूस्ती करणे.	रू. ६,६४,८००/-	मे. साईरिमत मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता.. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
६	प्रभाग समिती क्र. ४ कार्यालयाकरीता भुमिगत गच्चीवरील पाण्याची टाकी बांधणे.	रू. २,२१,८००/-	मे. संदेश मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
७	भाईंदर (पूर्व) बंदरवाडी व नवघर येथिल आरोग्य केंद्रात दुरूस्ती करणे.	रू. ७,५०,३४७/-	मे. विठ्ठलकृपा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. मुरबाड, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
८	मिरारोड काशीगांव विनायकनगर येथील आरोग्य केंद्रात दुरूस्ती कामे करणे.	रू. ५,८१,१५३/-	मे. बावघर मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने

९	भाईंदर (पूर्व) चौपाटी येथिल विधी कार्यशेड समोर जलवाहतुकी साठी सिमेंट कॉक्रीटचा धक्का बांधणे. (नगरसेवक निधी)	रू.१०,००,०००/-	मे. ओमअभिनव मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. .जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
१०	मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात रस्साज सिनेमा येथील व कनकिया येथील प्रभाग कार्यालय येथे विदयुत फिटींग व इतर आवश्यक कामे करणे.	रू. ६,२८,१४९/-	मे. शर्मिली आदि मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, .जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
११	भाईंदर (पूर्व) एस.एम. पब्लिक स्कूल येथून मणिभद्र नगरकडे जाणा-या नाल्यावर स्लॅब टाकणे.	रू. १८,०००/-	मे. श्रीगणेश इंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय दराने
१२	भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १८ मधील साधूराम हॉटेल समोर नाल्यावर झाकण बसवून स्लॅब टाकणे.	रू. १९,६००/-	मे. श्रीगणेश इंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय दराने
१३	भाईंदर (प) लेक व्हयू सोसायटीच्या समोरील गटार तयार करून स्लॅब टाकणे.	रू. ४९,८००/-	मे. यश इंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय दराने
१४	भाईंदर (प) राधा वल्लभ ते स्पॅन हाईट टॉवर पर्यंत गटार तयार करणे.	रू. ९,९९,५००/-	मे. सरीता मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. .जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
१५	भाईंदर पश्चिम आय.डी.बी.आय बँकेच्या मागे सभागृह बांधणे. (आमदार निधी)	रू. १०,००,०००/-	मे. शुभलक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. डहाणू .जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
१६	भाईंदर (प) आरक्षण क्र. १०० उदयान विकसित करणे. (आमदार निधी)	रू. १०,००,०००/-	मे. यशोधन मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. मुरबाड .जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
१७	भाईंदर पश्चिम देवकीनंदन इमारतीस रामोरील रस्ता व गटार तयार करणे. (आमदार निधी)	रू. ५,००,०००/-	मे. नवलाई मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. .जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
१८	उत्तन भाटेबंदर येथील इश्वरकृपा घराशेजारील उघडया गटारास आर.सी.सी. गटार बांधणे.	रु.५,००,०००/-	मे. सोहम मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. भिवंडी , जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
१९	भाईंदर (प) टेंभा हॉस्पीटल पोस्ट मॉर्टम रूम मध्ये कडप्पा कपाटे व पोस्टमार्डम टेबल व इतर वाढीव कामे करणे.	रू. ९,९७,२००/-	मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता.जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
२०	भाईंदर (पूर्व) बी.पी रोड साईबाबा मंदिरा पासून महादेव मंदिर ते व्यंकटेश्वर नगर व महादेव नगर ते शिवलिंग बिल्डर्स केबिन रोड पर्यंत सील कोट टाकणे.	रु.५,०२,१००/-	मे. गणनाथ मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. . जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने

२१	भाईंदर (पूर्व) राजवी पॅलेज अपार्टमेंट समोर सी.सी. गटार बांधून स्लॅब टाकणे.	रु. ३,७१,६०० /-	मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर . जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
२२	भाईंदर (पूर्व) विकास उदयोग नगर ते रावल नगर, नर्मदा नगर नाल्यापर्यंत नाला बांधून स्लॅब टाकणे.	रु. ४,६०,२०० /-	मे. सरीता मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. . जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
२३	मा. महापौर निवास स्थानात रंगकाम व इतर काम करणे.	रु. २,००,००० /-	मे. गणनाथ मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. . जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
२४	भाईंदर (पूर्व) गोविंद स्मृती इमारती मागे गटार बांधणे व गोविंद नगर ते नाकोडा पर्यंत गटार दुरूस्ती करून स्लॅब टाकणे.	रु. ४,९८,००० /-	मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
२५	भाईंदर (पूर्व) किरण नगर नाल्यावर संरक्षण लोखंडी रेलिंग बसविणे. (आमदार निधी)	रु. ७,२५,००० /-	मे. शिवअमृत मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. . जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
२६	भाईंदर (पूर्व) विध्यवासीनी बिल्डींग पासून मातोश्री बिल्डींग पर्यंत नाल्यावर चेकर्ड लादी बसविणे व सुशोभिकरण करणे. (आमदार निधी)	रु. ७,०५,००० /-	मे. जवाहर मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
२७	मिरारोड शांतिनगर से. २ डी – ३ ते सी – ३० ते अे – १८ पर्यंत गटार बांधणे.	रु. १०,००,००० /-	मे. चिंतामणी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. भिवंडी, . जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
२८	मिरारोड शांतिनगर से. ८ मधील सी – ३७, सी – ३६ पर्यंत गटार बांधणे व स्लॅब टाकणे व से. ७ मधील अंतर्गत गटारे बांधणे.	रु. ६,१७,००० /-	मे. शुभलक्ष्मी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. . जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
२९	भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १६ मधील सदविचार को.ऑप. व ईशा बी विंग या इमारती समोर पेव्हर ब्लॉक बसवून कांचनमृग इमारती समोरील क्रॉसिंगवर स्लॅब टाकणे.	रु. ५,००,००० /-	मे. आशा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर . जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
३०	भाईंदर (पूर्व) नर्मदा नगर रोडवरील साई सागर इमारती लगतच्या नाल्याचे बांधकाम करून स्लॅब टाकणे	रु. ९,९८,००० /-	मे. सरीता मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. . जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
३१	मिरारोड वॉर्ड क्र. ५३ मधील सना अपा. ते सेंट हॅरिस स्कूल, आनंद पॅराडाईज, स्वरूप आयेशा अपा. गटारावर स्लॅब टाकणे.	रु. ६,२३,०५० /-	मे. रिफ्युजी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने

३२	मिरारोड परिसरात बगिच्यांची दुरूस्ती करणे, गटारावर स्लॅब टाकणे व स्लॅबची दुरूस्ती करणे व चेकर्ड लादया बसविणे.	रु. ९,८०,००० /-	मे. लुणंगदेव मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर . जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
३३	मिरारोड सिंगापूर प्लाझा समोरील गटार बांधणे, स्लॅब टाकणे व झाकणे बसविणे.	रु. २,६९,५०० /-	मे. जयशिवराय मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. . जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
३४	मिरारोड शांतिनगर से. ८ मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व आर.सी.सी. बसविणे.	रु. ४,१२,६०० /-	मे. लुणंगदेव मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर . जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
३५	भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १३ मधील समर्थकृपा बंगल्यापासून सोलंकी पार्क पर्यंत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे.	रु. ९,९७,२०० /-	मे. जयशिवराय मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. . जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
३६	भाईंदर (पूर्व) सर्व्हे क्र. २०९ या जागेत सामाजिक सभागृह बांधणे. (नगरसेवक निधी)	रू. ८,७२,०००/-	मे. शरप्रभा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. . जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने

वरील पैकी अ.क्र. १ ते ३६ या कामाकरीता मा.आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामांचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार अवलोकन करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २८/०५/२०१०

(के प्रस्ताव)

प्रकरण क्र. ५९

ठराव क्र. १६

ठराव

मिरा भाईदर शहर सुमारे ७९ चौरस किलो मीटर क्षेत्र ऐवढे आहे. शहरामध्ये बरेच नैसर्गिक नाले व त्यात अर्तभूत असलेले पावसाचे व सांडपाणी वाहून नेणारे बरेच नाले व गटारे आहेत. या शहराची लोकसंख्या १० लाखाच्या आसपास असून दररोज ३५० ते ४०० टन कचरा औद्योगिक व रहिवाशी क्षेत्रामधून उत्पन्न होतो. दैनेदिन शहरामधून निघणारा कचरा गोळा करून त्याचा विल्हेवाट लावणे, नाले गटारांची सफाई, रस्त्यांची सफाई करणे हे महापालिकेचे परम कर्तव्य आहे.

भूतकाळामध्ये महानगरपालिकेच्या स्थायी सफाई कर्मचा-यांच्या माध्यमातून त्यानंतर ठेकामजदूर वार्षिक ठेक्यावर घेऊन शहर स्वच्छ ठेवण्याचे कामकाज प्रशासन चालवित होते. सन २०१०/२०११ मध्ये महापालिका प्रशासनाने सूचविल्याप्रमाणे शहराच्या ७९ वॉर्डचे २४ गट तयार करण्यात आले. प्रत्येक गटामध्ये सूचविलेले असतील तेवढया वॉर्डमध्ये दैनंदिन साफसफाई, कचरा गोळा करणे व वर्षातून २ वेळा नाले सफाई करणे कामाचा विषय महासभेसमोर ठेवला. दि. १/७/२००९. महासभे मध्ये प्रशासनाने सूचविलेल्या गटाप्रमाणे सफाई कामकाजाच्या धोरणात्मक निर्णयाला ठराव क. १७ च्या माध्यमातून मान्यता दिली. ठरावामध्ये स्पष्टरित्या मांडण्यात आले आहे, प्रत्येक गटाचे ठेकेदार दररोज रस्त्याची साफसफाई, कचरा गोळा करणे व वर्षातून दोन वेळा नाले सफाई करतील व प्रत्येक सफाई कर्मचा-यांना गणवेश पुरवतील आणि गणवेशावर ठेका घेणा-या कंपनीचे नाव आणि गट कमांकाचा उल्लेख करतील. नियमाप्रमाणे निविदा प्रसिद्ध करण्यात आल्या. ज्या ठेकेदारांनी त्यांना पटेल त्या योग्य रकमा भरून प्रशासनाने दिलेल्या अटी शर्तीना मान्य करून वार्षिक सफाई कामाचा ठेका गटाप्रमाणे स्वीकारला.

महासभेच्या या ठरावाला अधिन राहून मा. स्थायी सभा दि. २५.०२.२०१० रोजी ठराव क. ११० - २४ गटांच्या निवेदनांना मंजूरी देण्यात आली. मात्र आजमितीस पर्यंत ठेकेदाराने कर्मचा-यांना गणवेश पुरविलेले नाहीत. पावसाच्या आधी युद्ध पातळीवर करण्यात येणारे नाले सफाईचे काम पुर्ण केलेले नाही व दैंनदिन सफाई व कचरा उचलण्याचे कामही मनूष्यबळ कमी असल्या कारणाने समाधानपूर्वक होत नसल्याचे दिसून येत नाही. वारंवार लोकप्रतिनिधी व रहिवाशी सदर बाबतची तकार मा. आयुक्तांच्या निदर्शनात आणून देतात. तथापी असे असमाधानकारक काम करणा-या ठेकेदारांवर दंडात्मक कार्यवाही करावी व वार्डमध्ये दैनंदिन सफाई कचरा उचलणे, नाले सफाई करण्याचे काम समाधान पूर्वक झाल्याचे दाखले वार्डचे नगरसेवकांकडून घेतल्याशिवाय ठेकेदारांचे देयक रक्कम अदा करू नये असा मी ठराव मा. स्थायी समिती मध्ये मांडत आहे.

सूचक : श्री. जुबेर इनामदार.

Inamdar
28/5/10

अनुमोदक : N. Sale
निर्मला सावळ
28-05-2010

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. २८/०५/२०१०

दुःखवठा ठराव क्र. १७ :-

काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नगरसेवक व मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये ज्यांनी आपल्या कर्तुत्वाने खऱ्या अर्थाने या शहराचे नाव रोषण केले. महानगरपालिकेची मा. महासभा असू दे किंवा इतर कार्यक्षेत्र असू दे त्यांचा जो दांडगा अभ्यास आणि मा. महासभेमध्ये प्रत्येक विषया विषयी असलेले सखोल ज्ञान, अभिनव शेतकरी शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष आणि काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नगरसेवक प्रफुल्ल पाटील ह्यांच्यावर दि. ८ मे २०१० रोजी भ्याड हल्ला झाला आणि त्यामध्ये त्यांचे दुःखद निधन झाले. प्रथमतः भ्याड हल्ल्याचे माझ्या पक्षातर्फे आणि सर्व सदस्यांतर्फे मी त्याचा निषेध करतो. हा हल्ला खरं तर त्यांच्यावर नव्हता तर पूर्ण शहरावर तो हल्ला होता. अशाप्रकारचे एक व्यक्तीमत्व, ज्याने प्रतिकूल परिस्थितीशी झगडून आपले शिक्षण पूर्ण केले. आपल्या कामधंद्यामध्ये यश मिळवले आणि ते यश मिळवल्यानंतर या शहराबद्दल जे दायीत्व आहे, ते अभिनव शिक्षण संस्था सारखेच शेतकरी संस्था स्थापन करुन त्याच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले त्यांनी फार्मसी, बी.ए., डी.एड., इंजिनिअरिंग सारख्या नविन फॅकल्टीस सुरु केल्या. पायलट ट्रेनिंग स्कुल चालु करण्याचे त्यांचे पुढील स्वप्न होते. या शहरामध्ये त्यांनी एम.बी.ए. अशासारख्या फॅकल्टीज चालु केल्या. संपूर्ण जगामधून विविध देशांनी त्यांचा सत्कार केलेला आहे. किती तरी प्रकारच्या त्यांना डॉक्टरेट पदव्या मिळालेल्या आहेत. नेपाळ गर्व्हमेंटकडून त्यांना डॉक्टरेट पदवी मिळणार होती आणि त्यांचा सत्कार पुढील काही महिन्यातच होणार होता. परंतु, त्या अगोरदरच हे भ्याड कृत्य या शहरामध्ये घडले आणि त्यामध्ये प्रफुल्ल पाटील सारख्या एक अभ्यासू, जिज्ञासु नगरसेवकाचे दुःखद निधन झालेले आहे. त्याबद्दल स्थायी समितीच्या सर्व सदस्यांतर्फे मी त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी आणि त्यांच्या कुटूंबियांना या प्रसंगातून बाहेर पडण्यास बळ मिळावं अशी प्रार्थना करुन दुःखवठा ठराव मांडतो. तसेच राजस्थानचे पूर्व उपराष्ट्रपती श्री. भैरवसिंग शेखावत यांचेसुध्दा निधन झालेले आहे तसेच सन्मा. आमदार वसंत डावखरे साहेब यांच्या पत्नीचे निधन झालेले आहे तर परमेश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो. असा मी प्रस्ताव मांडत आहे. आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेचे कर्मचारी संज्याव नुनिस यांच्या मुलाचे सुध्दा निधन झाले तर परमेश्वर त्यांच्या आत्म्याला चिरशांती देवो असा मी प्रस्ताव मांडत आहे.

सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत **अनुमोदक :- श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद**

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती दि. १६/०६/२०१०

प्रकरण क्र. २९ :- दि. ०९/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ५८ :-

दि. ०९/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- **अनुमोदन :-**

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

43

मा. स्थायी समिती सभा दिनांक १६/०६/२०१०

प्रकरण क्र. २९ :- केंद्र शासनाच्या JNNURM योजने अंतर्गत खरेदी केलेल्या बस प्रकल्पाकरिता महानगरपालिका फंडातुन तात्पुरत्या कालावधी करीता बस प्रकल्प खात्यात निधी वर्ग करण्याबाबत.

ठराव क्र.१९ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेने परिवहन सेवेकरिता केंद्र शासनाच्या JNNURM योजने अंतर्गत ५० नवीन बस खरेदी केल्या आहेत. सदर बस खरेदी प्रकल्पाकरीता सुमारे रू. ९,८८,७८,८००/- इतका खर्च येणार आहे. सदर खर्चाच्या रक्कमेपैकी ३५ टक्के रक्कम रू. ३,४६,०७,५८०/- व १५ टक्के रक्कम रू. १,४८,३१,८२०/- मिळून रक्कम रू. ४,९४,३९,४००/- इतकी अनुक्रमे केंद्र व राज्य शासन अनुदानापोटी देणार आहे व प्रकल्प करीताची उर्वरीत ५० टक्के रक्कम रू. ४,९४,३९,४००/- ही महानगरपालिकेस पी.पी.पी. च्या माध्यमातून उभारावयाची आहे व त्यास मा. महासभेने ठराव क्र. ५१, दि. ११/०२/२०१० अन्वये मंजुरी दिलेली आहे.

प्रकल्पा करीता केंद्र व राज्य शासनाकडून मिळावयाच्या एकूण अनुदानाच्या रक्कमेपैकी रू. १,३७,००,०००/- रक्कम प्रकल्प खात्यात जमा झाली असून सर्व परवानगीने सदर रक्कम कंत्राटधारकांना कंत्राटाबाबत आगाऊ रक्कम (Advance Amount) म्हणून अदा केली आहे. सद्यस्थितीत शासनाकडून मिळावयाच्या अनुदान रक्कमेपैकी रक्कम रू. ३,९८,३९,४००/- अजून प्राप्त व्हावयाची आहे व ही रक्कम शासनाकडून टप्प्या-टप्प्याने मिळणार आहे.

मा. महासभेने दिलेल्या मंजुरीच्या अनुषंगाने प्रकल्पाकामी पी.पी.पी. च्या माध्यमातुन कंत्राटदार नेमून त्यांचेकडून प्रकल्पाकरीता रू. ४,९४,३९,४००/- इतकी रक्कम उभारावयाच्या कामाची निविदा जाहिरात तयार करणे, मात्र महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेच्या ठाणे जिल्ह्यातील निवडणूकीकामी क्षेत्रात आचार संहिता लागु होती व सदर कार्यवाहीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याने त्यास किमान महिना किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी लागण्याची शक्यता आहे. प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण करण्याकरिता केंद्र व राज्य शासन यांची भूमिका आग्रही आहे. महानगरपालिकेस, पी.पी.पी. च्या माध्यमातुन निधी उभारण्यास उशीर झाल्यास शासनाकडून कार्यवाही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बस प्रकल्पाकरीता पी.पी.पी. च्या माध्यमातुन महानगरपालिकेस रक्कम उभारण्याच्या कालावधीपर्यंत महानगरपालिकेच्या मुख्य निधीतुन रक्कम रू. ४,९४,३९,४००/- इतकी बस प्रकल्पाकरीता **"युनियन बॅंक ऑफ इंडिया"** भाईंदर (प.) शाखा येथे नव्याने उघडलेल्या प्रकल्प खात्यात वर्ग करणे व पी.पी.पी. च्या माध्यमातुन बस प्रकल्पा करिता खाजगी संस्थाकडून रक्कम रू. ४,९४,३९,४००/- इतकी बस प्रकल्प खात्यात जमा झाल्यानंतर ती रक्कम महानगरपालिकेच्या मुख्य निधीत जमा करण्याच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. अनिल दिवाकर सावंत **अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

ठरावाच्या बाजुने	ठरावाच्या विरोधात	तटस्थ
१) श्री. दिनेश नलावडे	१) श्री. शरद पाटील	निरंक
२) श्री. अनिल दिवाकर सावंत	२) श्री. मदन उदितनारायण सिंह	
३) श्री. याकुब इस्माईल कुरेशी	३) श्री. प्रविण पाटील	
४) श्री. जुबेर इनामदार	४) श्रीम. वर्षा भानुशाली	
५) श्री. चंद्रकांत मोदी		
६) श्री. चंद्रकांत म्हात्रे		
७) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद		
८) श्रीम. ग्रिटा फॅरो		
९) श्रीम. निर्मला सावळे		
१०) श्रीम. सुधा व्यास		
११) श्रीम. अनिता पाटील		

ठराव बहुमताने मंजुर

ठराव वाचून कायम करण्यात आला.

sd/-

सभापती

स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १६/०६/२०१०

प्रकरण क्र. (२२) :- भाईंदर (पूर्व) गोडदेव ज्योती पार्क मागील व भाईंदर (प.) ॲटलॅक हॉटेल मागील धोकादायक शौचालय तोडणेस मान्यता देणे बाबत.

ठराव क्रमांक (२०)

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पूर्व) गोडदेव येथे ज्योती पार्क मागील ागेत चार गाळयाचे शौचालय आहे. सदर शौचालय हे खुप जुने असून सदर शौचालयास ोठया प्रमाणावर तडे व भेगा गेलेल्या आहेत. ठिकठिकाणी प्लास्टर कोसळून लोखंड उघडे ालेले आहे. सदर शौचालय दुरूस्ती होउु शकत नाही व सद्यस्थितीत वापरात नाही. तसेच ाईंदर (प.) गीतानगर येथे ॲटलॅक हॉटेल मागे पाच गाळयाचे एक शौचालय ग्रामपंचायत ालावधीमध्ये बांधण्यात आलेले असून सदर शौचालय मोडकीस आलेले आहे. भाईंदर (प.) गोडदेव येथे

वरील दोन्ही शौचालय तोडण्यास मान्यता देण्यात येत आहे. भाईंदर गोडदेव येथे नविन शौचालय बांधण्यास व ॲटलॅक हॉटेल मागे पुन्हा बांधण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. अनिल भायंदर

अनुमोदन :- श्री. प्रेरा फेरो

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

-11/DKV/DK/ T 5

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. १६/०६/२०१०

प्रकरण क्र. २३ :- निविदा मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)

ठराव क्र. २१ :-

दि. ०५/०३/२०१० रोजीच्या दै. लोकमत, दै. फ्रि प्रेस या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या विषयांकीत जाहीर निविदा सुचनेनुसार प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१) शांती पार्क मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,९६,५४४/-)

ठेकेदाराचे नाव	देकार
मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस	४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.८० % ज्यादा दराने
मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स	८.००% ज्यादा दराने
मे. साईविणा इंटरप्राईजेस	१२.२४% ज्यादा दराने

२) शांती नगर मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १८,३४,५४४/-)

ठेकेदाराचे नाव	देकार
मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस	४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.८० % ज्यादा दराने
मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स	८.००% ज्यादा दराने
मे. साईविणा इंटरप्राईजेस	१२.२४% ज्यादा दराने

३) सृष्टी मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,९६,५४४/-)

ठेकेदाराचे नाव	देकार
मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस	४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.९० % ज्यादा दराने
मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स	८.००% ज्यादा दराने
मे. साईविणा इंटरप्राईजेस	१२.२४% ज्यादा दराने

४) शांती नगर सेक्टर ३ मलनिःसारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,७३,४३२/-)

ठेकेदाराचे नाव	देकार
मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस	४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.८० % ज्यादा दराने
मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स	८.००% ज्यादा दराने
मे. साईविणा इंटरप्राईजेस	१२.२४% ज्यादा दराने

५) शांती नगर सेक्टर ८ मलनिःसारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,००,८०८/-)

ठेकेदाराचे नाव	देकार
मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस	४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.९० % ज्यादा दराने
मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स	८.००% ज्यादा दराने
मे. साईविणा इंटरप्राईजेस	१२.२४% ज्यादा दराने

६) मिरा (एम.आय.डी.सी.) येथील पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १७,३८,८०८/-)

ठेकेदाराचे नाव	देकार
मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस	४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.९० % ज्यादा दराने
मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स	८.००% ज्यादा दराने
मे. साईविणा इंटरप्राईजेस	१२.२४% ज्यादा दराने

७) अस्मिता पार्क येथील पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १६,१६,५४०/-)

ठेकेदाराचे नाव	देकार
मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस	४.५९% ज्यादा वाटाघाटीअंती २.८० % ज्यादा दराने
मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स	८.००% ज्यादा दराने
मे. साईविणा इंटरप्राईजेस	१२.२४% ज्यादा दराने

८) जेसल पार्क मलनिःसारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे.
(अंदाजित रक्कम रू. १८,३४,५४४/-)

ठेकेदाराचे नाव	देकार

मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स	**१.०० % कमी दराने**
मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस	०.७० % कमी दराने
मे. साईविणा इंटरप्राईजेस	१२.२४% ज्यादा दराने

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ ते ७ च्या कामांकरीता मे. ॲकॉर्ड मार्केटींग ॲन्ड सर्व्हिसेस यांचे दर लघुत्तम आहेत तर अ.क्र. ८ च्या कामाकरीता मे. ग्रॅव्हीट इंजिनिअरींग वर्क्स यांचे दर लघुत्तम आहेत. सबब उपरोक्त लघुत्तम दर वाजवी व रास्त असल्याने सदर निविदा मंजुरीस व याकामी वेळोवेळी येणारी देयके मंजूर करणेस मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. जुबेर इनामदार **अनुमोदक :- श्रीम. ग्रिटा फॅंरो**

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. १६/०६/२०१०

प्रकरण क्र. २४ :- नाले सफाई कामाचा आढावा घेणे.

(नाले सफाई कामाचा आढावा घेण्यात आला.)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती दि. ०७/०७/२०१०

प्रकरण क्र. २५ :- दि. १७/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. २२ :-

दि. १७/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

7/7/10 सुचक :- श्री. जुबेर इनामदार

अनुमोदन :- श्रीमती. गीता फेरो

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०७/२०१०

प्रकरण क्रमांक (२६) - मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मैदानावे भाडे ठरविणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्रमांक (२३)

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी मैदाने विकसित करण्यात आलेली आहेत. सदर सभेपूर्वी मा. स्थायी समितीचे ठराव झाल्याप्रमाणे मैदाने भाडयाने देण्यात यावीत. मिरारोड आरक्षण क्र. १७० मधील मैदान कोणत्याही कार्यक्रमास (शैक्षणिक / धार्मिक कार्यक्रमासहीत) भाडयाने देण्यात येऊ नये.

सुचक :- श्री. अनिल सावंत

अनुमोदन :- सौ. ग्रेटा फॅरो

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

50

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्थायी समिती सभा दि. ७/७/२०१०

प्रकरण क्रं :-२७ MMRDA कडील कर्ज परतफेड करणेबाबत.

ठराव क्रं :- २४

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अत्यावश्यक सेवांवरील खर्च प्रतिमहा ८ कोटी रुपये आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेचा जकात कर १ एप्रिल २०१० पासुन शासनाने बंद केला आहे. त्यामुळे अत्यावश्यक मूलभूत सेवा पुरविणेदेखील कठीण होवून बसले आहे. सध्या मनपाकडे रक्कम रु.२५ कोटी इतके सर्व विभागाचे दायित्व आहे. नव्याने लागू केलेला स्थानिक संस्था कर पाहता आजतागायत केवळ ८.०९ कोटी व रु. ९.२६ कोटी १% मुद्रांक शुल्क अधिभार असे एकूण एप्रिल ते जून पर्यंत रक्कम रु.१७.३५ कोटी इतकी स्थानिक संस्था कराची वसुली झालेली आहे. पैकी १% मुद्रांक शुल्क अधिभाराची रक्कम रु.९.२६ कोटी शासनाकडून अद्यापही प्राप्त झालेली नाही. १ एप्रिल २०१० ते ३० जून २०१० पर्यंत जकाती पासुनचे उत्पन्न रक्कम रु.२४ कोटी इतके प्राप्त झाले असते. परंतू स्थानिक संस्था करापोटी झालेली वसुली पाहता रक्कम रु. ६.६५ कोटी इतकी तूट आली आहे. व १% शासनाकडून मुद्रांक शुल्कापोटीची रक्कम रु. ९.२६ कोटी इतकी मनपास प्राप्त न झाल्याने माहे जून २०१० अखेर MMRDA कडील कर्ज परतफेड हप्ता रक्कम रु. ४,९४,२३,९९१/- इतकी रक्कम MMRDA कडे मुदतीत न भरल्यास MMRDA कडून मुदत ठेवीमध्ये ठेवलेली रक्कम एस्क्रो अकाऊन्ट मध्ये परस्पर मुदत पूर्व काढून घेतल्यास रक्कम रु. ३५,६९,३३०/- इतके व्याजाचे नुकसान होईल.

मनपाने MMRDA चे कर्ज मंजूरी प्रकरणी करारनाम्यातील अटीशर्तीनुसार १ हप्त्या इतकी रक्कम कर्ज परतावा निधी म्हणून बाजूला ठेवून ती मुदतठेवीत गुंतविण्यात आलेली होती. मुदत ठेवीतील रक्कम रु. ४,९७,३३,२८४/- इतकी असुन नियत दिनांकास रक्कम रु. ६,०१,०६,०८९/- इतकी प्राप्त होणार आहे व मुदतपूर्व काढल्यास रक्कम रु. ५,६५,३६,७५९/- इतकी प्राप्त होणार आहे. म्हणजेच रक्कम रु. ३५,६९,३३०/- इतक्या रक्कमेचे व्याजाचे नुकसान होईल. रक्कम रु. २,६४,०१,२२७/- हया मुदत ठेवीची दि. १५/१०/१० रोजी मुदत संपत असल्याने या रक्कमेवर बँकेकडून ३ कोटी रु. कर्ज, (O.D.) घेवुन उर्वरित रक्कम रु. १,९४,२३,९९१/-मनपा जनरल फंडावरुन भरुन MMRDA कडील रक्कम रु. ४,९४,२३,९९१/- कर्ज हप्ता मुदतीत भरण्यास आजची सभा कार्योत्तर मंजूरी देत आहे.

सूचक :- श्री. जुबेर इनामदार

अनुमोदन :- श्रीमती सुधा [illegible]

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०७/२०१०

प्रकरण क्र. :-(२८) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) हॉस्पीटल मधील ब्लड बँक करीता वातानुकुलित यंत्रणा बसविणे.

ठराव क्रमांक (२५)

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र. १९२/१९३ येथे सुसज्ज असे हॉस्पीटल इमारत बांधण्यात आलेली असून सदर इमारतीमधील ब्लड बँक ऑपरेशन थिअटर येथे वातानुकुलीत यंत्रणा आवश्यक त्या साहित्यसह बसविणे गरजेचे आहे. सदर कामी रु. १२,४९,९५०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर कामी "मिरारोड हॉस्पीटल" या लेखाशिर्षखाली रु. २०,००,०००/- इतकी तरतुद उपलब्ध आहे.

तरी सदर कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. अनिल सावंत

अनुमोदन :- श्री. बर्नड डिमेलो

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि.७ /७/२०१०

// ठराव //

प्रकरण क्र. :- २९ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट कुत्र्यांच्या निर्बिजीकरण व लसीकरणाच्या कामास मुदतवाढ देणेबाबत.

ठराव क्र. २६

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण [illegible] येथे प्रकल्प सुरु आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्रे [illegible] निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण व [illegible] कुत्र्यावर औषधोपचार करून [illegible] सोडण्यात येतात.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट कुत्र्याचे निर्बिजीकरण व लसीकरणाचे [illegible] मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी या संस्थेस [illegible] आहे. मे. ॲनिमल वेल्फेअर सोसायटी या संस्थेस मोकाट कुत्र्यांचे व निर्बिजीकरण शस्त्रक्रिया [illegible] कामास ०१ वर्षे मुदतवाढ व येणाऱ्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

सुचक :- श्री. बर्नड डिमेलो

अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोहिते

सभापती
स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०७/२०१०

प्रकरण क्र. ३० :- एमएमआरडीए कडून निर्मळ अभियान अंतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालयाच्या कामाचा आढावा घेणे.

(सदर कामाचा आढावा घेण्यात आला.)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०७/२०१०

प्रकरण क्र. ३१ :- पाणी पुरवठा कामाचा आढावा घेणे.

(सदर कामाचा आढावा घेण्यात आला.)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ७ / ७ /२०१०.

प्रकरण क्र. ३२ :- माजी सैनिकांना मालमत्ता करामध्ये सुट मिळणे बाबत.
ठराव क्र. २७ :-

औरंगाबाद महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, कल्याण डोंबीवली महानगरपालिकेतील माजी सैनिक व त्यांची पत्नी हयात आहेत अशा माजी सैनिकांच्या घरांना महानगरपालिकेच्या मालमत्ता करातील सामान्य करात १००% सवलत देण्यांत येते. तथापि त्यांच्या वारसांना मालमत्ता करात सवलत देण्यांत येत नाही. याच धर्तीवर मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या हद्दीत राहणाऱ्या माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नीस त्यांच्या मालमत्ता करात माफीची सवलत देण्याबाबत महानगरपालिका विचाराधीन होती.

देशासाठी लढणाऱ्या माजी सैनिकांना सेवा निवृत्तीनंतर आर्थिक स्थितीला सामोरे जावे लागते. त्यांनी केलेल्या देश कार्याचा विचार करता मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील माजी सैनिक व त्यांची पत्नीस हयात असेपर्यंत मालमत्ता कराच्या सामान्य करात १००% इतकी मालमत्ता करात सवलत देण्याच्या धोरणात्मक निर्णयास मान्यता देण्यांत येत आहे.

मिरा-भाईदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील माजी सैनिक व त्यांची पत्नी हयात असेपर्यंत मालमत्ता कराच्या सामान्य करात १००% सवलत देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे. तथापि मालमत्ता करात सुट देण्यापूर्वी माजी सैनिक किंवा त्यांची पत्नी यांना दरवर्षी १५ मार्च पूर्वी हयात असल्याचा दाखला सादर करावा लागेल. या तारखेपूर्वी हयात असल्याचा दाखला सादर केल्यानंतरच मालमत्ता करात सूट देण्यांत येईल. तसेच त्यांच्या वारसास सवलत लागू होणार नाही. सदर सवलत ही माजी सैनिक व त्यांची पत्नी हयात असेपर्यंत माजी सैनिकांच्या राहत असलेल्या एकाच घरासाठी लागू राहील. तसेच बिगर निवासी वापरासाठी असलेल्या मिळकतीला ही सवलत लागू होणार नाही. तसेच परवानगी प्राप्त नसलेल्या इमारतीमध्ये शास्तीसह कर आकारणी असलेल्या इमातींमध्ये माजी सैनिकांनी घर/फ्लॅट खरेदी केल्यास अशा मालमत्तांमध्ये सवलत देता येणार नाही. या शर्तीवर उपरोक्त प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभेपुढे सादर करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. अनिल सावंत

अनुमोदक :- श्रीम. गिता फेरो

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईदर महानगरपालिका

मिरा-भाईदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ७ / ७ /२०१०

प्रकरण क्र. ३३ :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत प्लास्टीक पिशव्या आणि थर्माकोल यांच्यावर बंदी घालणे बाबत.

ठराव क्र. २८ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दुकानदार, उपहारगृहे, पदार्थ विक्रेते, माल संग्रहक, व दुकानदार हे ग्राहकांना माल देण्यांसाठी प्लास्टीक पिशव्यांचा वापर करीत असतात. हा वापर मोठया प्रमाणात असल्याने शहरातील नागरीक त्या प्लास्टीक पिशव्या सार्व. ठीकाणी, रस्ते, गटारे, मोकळया जागा तसेच इतर ठीकाणी टाकत असतात. त्यामुळे शहरातील लहान मोठी गटारे, नाले हे या प्लास्टीक पिशव्यामुंळे तुंबुन राहतात व त्यामुळे पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नाही.

महाराष्ट्र शासन अध्यादेश दि. ०३/०३/२०१० महाराष्ट्र विघटनशील कचरा (नियंत्रण) अध्यादेश २००६ अन्वये ५० मायक्रोनपेक्षा कमी जाडीच्या व ८" X १२" कमी आकाराच्या प्लास्टीक पिशव्या विक्री करणे, वितरणे करणे व साठवणुक करणेस बंदी आहे. त्यानुसार कॅरी बॅग जप्तीची कारवाई सुरु आहे. असे असले तरी पॅकींग मटेरीअल तयार करण्यांत येणाऱ्या प्लास्टीक पिशव्या व ८" X १२" पेक्षा मोठया पिशव्यांचा वापर महानगरपालिका क्षेत्रात सुरु आहे. या पिशव्यांमुळेही सांडपाण्याचा निचरा होण्यास अडथळ निर्माण होत आहे.

महानगरपालिका क्षेत्रात प्लास्टीक पिशवी, पॅकींग मटेरीयल, कॅरी बॅग, किराणा दुकानात वापरण्यांत येणाऱ्या प्लास्टीक पिशव्यांना पुर्णपणे बंदी घालण्याच्या धोरणात्मक निर्णयाकरीता सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभेपुढे सादर करण्यांस ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. अनिल सावंत

अनुमोदक :- श्री. बर्नड डिमेलो

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
स्थायी समिती सभा दि. ७/७/२०१०

प्रकरण क्र :- ३४ मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या निविदांचे अवलोकन करणे.
मा. पदाधिकारी व अधिकारी यांना बॅगा खरेदीबाबत....

ठराव क्र :- २९

दरवर्षीप्रमाणे मा. पदाधिकारी व अधिकारी यांना बजेट सादर करतांना बॅगा दिल्या जात असतात. यावर्षीही सन २०१०-११ चे अंदाजपत्रकासोबत बॅगा वाटपासाठी "जनमत" या वृतपत्रामध्ये जाहिर निविदा सूचना प्रसिध्द करून दर मागविण्यात आलेले होते. त्यामध्ये खालीलप्रमाणे सर्व करासह दर प्राप्त झालेले होते.

१) मे. मुदीर लेदर वर्क्स 4303/-

२) मे. प्लोरेन्स लेदर 4400/-

३) मे. मुस्कान इंटरप्रायझेस 4450/-

वरील प्राप्त दर पाहता मे. मुदीर लेदर वर्क्स यांचे कमीत कमी दर स्विकारण्यात आलेले होते. त्यानुसार त्यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. कार्यादेशाप्रमाणे त्यांनी 151 बॅगा पुरविलेल्या आहेत. त्यांचे देयक रु. 6,49,753/-(अक्षरी रु. सहा लक्ष एकोणपन्नास हजार सातशे त्रेपन्न मात्र) BPMC ACT 1949 चे कलम 73 (D) नुसार प्रदान करण्यात आलेले आहेत. यास आजची मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

सूचक :- श्री. प्रिती फुटो

अनुमोदन :- श्री. चंद्रकांत म्हात्रे

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती दि.०५/०८/२०१०
(दि. २६/७/२०१० रोजीच्या तहकुब सभा)

प्रकरण क्र. ३५ :- दि. २४/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. ३० :-

दि. २४/१२/२००९ रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ०५/०८/२०१०

(दि. २६/०८/२०१० रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. (३६) :- जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्नरुत्थान अभियांनातर्गत BSUP प्रकल्प पॅकेज (J1,J2,J3) जनता नगर व काशीचर्च निविदेस मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्रमांक (39) :-

मिरा भाईंदर महानगरपालिका मार्फत केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु शहरी पुनरुत्थान अभियानातर्गत "शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे" या कार्यक्रमातर्गत महानगरपालिका क्षेत्रातील जनता नगर व काशीचर्च या भागातील झोपडपट्टीयांमध्ये मुलभूत सुविधासह निवारा उपलब्ध करुन झोपडपट्टी निवारा योजनेचा प्रस्ताव तयार करुन म्हाडा मार्फत राज्य शासनास सादर करण्यात आला. राज्य शासनाने सदर प्रस्तावास मंजुरी देवून तद्नंतर प्रस्ताव मंजूरी साठी केंद्र शासनास सादर करण्यात आला. या प्रकल्पास केंद्र शासनाने दिनांक ११/११/२००९ रोजी मान्यता दिलेली असून प्रकल्पाची किंमत रु. २७९.५५ कोटी एवढी आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. महासभा दि. २०/११/२००९ ठराव क्र. ३६ अन्वये प्रकल्पाच्या रुपये ३०० कोटी एवढया खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली आहेत.

BSUP योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधिचा आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

अ.क्र	तपशिल	केंद्रशासनाचा हिस्सा व निधी	राज्य शासनाचा हिस्सा व निधी	मनपाचा हिस्सा व निधी	झोपडपट्टी धारक हिस्सा
१	घराची किंमत	५० % रु.६५२१.५५/-	३०% रु.३९१२.९२	९ % रु. ११७३.९३	११ % रु. १४३४.७५
२	मुलभूत सुविधा	५० % रु.४९०२.४०	२५ % रु.३९०८.४०	रु. ६०५९.८४	
	एकूण	रु.११४२९.९९	रु.७८५६.९१	रु.७२३३.७७	रु.१४३४.७९

हया प्रकल्पात आस्तित्वात असलेल्या शासकीय जमिनीवर वसलेल्या झोपडुपट्टीचे पूर्नवसन करणे अंर्तभूत आहे. सदर शासकीय जमिनीचे सर्व्हे नं मौजे काशिगाव ९०,९४,१०७/१/अ,१०८/१ व मौजे मिरेगाव सर्व्हे नं ७७, ७८ या जमिनीवर अस्तित्वात आहेत. सदर जमिन BSUP प्रकल्पासाठी मनपास हस्तातंर करण्यासाठी प्रस्ताव मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई, यांच्या मार्फत महसुल मा.अप्पर सचिव, व वने विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे दि.०८/०३/२०१० रोजी सादर केलेला आहे. हस्तांतराची अंतिम कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे.

निविदा प्रक्रियेसाठी महापालिकेमार्फत तांत्रिक समितीची नेमणूक करण्यात आली असून सदर तांत्रिक समितीमध्ये खालील सदस्य नेमण्यात आले आहेत.

१) प्रो.डॉ. व्ही. ज्योती प्रकाश. (IIT मुंबई)

२) प्रो.डॉ. आर. एस. जांगीड. (IIT मुंबई)

BSUP प्रकल्पासाठी प्रकल्याचा निविदा e-tendering माध्यातून दिनांक २८/२/२०१० रोजी दैनिक DNA व दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आला. तसेच कामाच्या निविदा पूर्व बैठक दिनांक १७/०३/२०१० रोजी घेण्यात आली. कामाची सविस्तर माहितीचे Presentation देण्यात आले. Pre-bid बैठकीमध्ये निविदाकारनी उपस्थित केलेल्या मुद्दांचे स्पष्टीकरण निविदा पूर्व बैठकीचा इतीवृत्तांत करण्यांत आले. तसेच निविदेतील अर्टीशतीमध्ये शिथीलता करण्यात आल्या व त्याची सुचनासाठी Corrigendum काढून दिनांक २१/०३/२०१० रोजी दैनिक DNA व दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रांत प्रसिध्द करण्यांत आल्या. निविदा फॉर्म फी स्विकृतीची तारीख ३१/०३/२०१० रोजी होती. निविदा फॉर्म व इसारा रक्कम स्विकृती डी.डी. स्वरुपात दि.०६/०४/२०१० रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत होती. निविदाकारांचा फॉर्म फी व एकूण इसारा रक्कम भरल्याचे विवरण तक्ता खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र	वर्णन	पॅकेज J1	पॅकेज J2	पॅकेज J3	काशी चर्च
१	निविदा फॉर्म	रु. ५०,०००/-	रु. ५०,०००/-	रु. ५०,०००/-	रु. २५,०००/-
२	इसारा रक्कम	रु. ४१.७९ लक्ष	रु. ३५.५७ लक्ष	रु. ३७.७८ लक्ष	रु. १४.०५ लक्ष
३	फॉर्म फी भरणारे एकूण निविदाकार	१२	१२	१०	११
४	इसारा रक्कम भरणारे निविदाकार	०३	०४	०३	०५

निविदा e-tendering द्वारे भरण्याची तारीख ७/४/२०१० रोजी ३.०० वाजेपर्यंत होती. Technical Bid उघडण्याची तारीख ७/४/२०१० ठिक ४.०० वाजता होती. सदर दिवशी Technical Bid उघडण्यात आली. खालील प्रमाणे निविदाकारांनी निविदा e-tendering द्वारे भरलेल्या आहेत.

	निविदा प्राप्त	निविदाकाराचे नांव
पॅकेज J1	०३	1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction 2) Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd, 3) Shayona Corporation & Toscano Infrastructure Pvt Ltd.
पॅकेज J2	०३	1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction 2) Jekin Enterprises & Kavya Buildcon Pvt Ltd. 3) Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd,
पॅकेज J3	०३	1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction 2) Sumer Corporation & S.V.Jiwani 3) Stresscreete India Ltd,
काशीचर्च	०२	1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction 2) D.K Infrastructures Pvt. Ltd., Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd,

निविदेतील Technical Bid चे evaluation करण्यात आली असून वरील सर्व निविदा धारक Pre-qualify होत आहेत. निविदेतील अटीशर्ती नुसार प्रत्येक पॅकेजसाठी आवश्यक असलेल्या Pre-qualification बाबतचे निविदाकारांचे विवरणपत्रे सोबत जोडली आहेत. वरील सर्व निविदाधारक Pre-qualify होत आहेत. त्यांचे दिनांक २०/४/२०१० रोजी Financial Bid उघडण्यात आले. त्यातील निविदाकारांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

	निविदाकाराचे नांव	निविदेतील दर	शेरा
पॅकेज J1	1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction	१३१७३६०१९८.००	L3
	2) Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd,	१३०४९९३१४३.०८	L2
	3) Shayona Corporation & Toscano Infrastructure Pvt Ltd.	१२७२७८५८९६.००	L1

पॅकेज J2	1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction	१०७४६८६०६७.००	L2
	2) Jekin Enterprises & Kavya Buildcon Pvt Ltd.	१०८१५४५७६५.३०	L3
	Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd,	१०५७३५३८९५.९६	L1
पॅकेज J3	1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction	१०८४१५९३३१.००	L1
	2) Sumer Corporation & S.V.Jiwani	१०९१२५५४७६.००	L2
	3) Stresscreete India Ltd,	११७४८५८४००.००	L3
काशीचर्च	1) Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction	४९६४६९५९८.७०	L2
	2) D.K Infrastructures Pvt. Ltd., Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd,	४७५४६७५८१.१०	L1

सर्वात कमी दर असलेल्या निविदाकारास दर कमी करणेबाबत पत्राद्वारे कळविण्यांत आलेले होते. मा. आयुक्त यांच्या दालनात दि.२६/०५/२०१० रोजी दर कमी करण्यासाठी बैठक झाली. ठेकेदाराना दर कमी करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. तद्नंतर लघुत्तम निविदाकारास वाटाघाटीने दर कमी करण्यासाठी मा.आयुक्त सो. यांच्याकडे दि. ०७/०७/२०१० रोजी परत बोलाविण्यात आलेले होते. दर कमी करुन दराची दरपृथःकरण सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते त्यानुसार ठेकेदारांनी दर कमी करण्याचे पत्र दिले आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल रु. २७९.५५ कोटी असून हा सन २००८-०९ च्या दरसुचीवर आधारीत होता. सन २००९-१० ची नवीन दरसुची माहे नोव्हेबर २००९ पासून अंमलात आली. सविस्तर प्रकल्प अहवालाची तुलना सन २००९-१० च्या दरसुचीनुसार केली असता किंमत रु. ३३०.३३ कोटी एवढी येत आहे.

सल्लागारामार्फत प्राप्त लघुत्तम निविदांचे दर सन २००९-१० चे दरसुचीनुसार तपासले असता लघुत्तम दर हे सरासरी १० % जास्त आहेत. व मंजुर प्रकल्पाच्या किमंतीच्या सरासरी ३०.१६ % जास्त आहेत (दरसुची २००८-०९ नुसार). वित्तीय आकृतीबंधानुसार केंद्र व राज्यशासनाचे प्रकल्पाकरिता अर्थसहयाची रक्कम मंजुरीप्रमाणे प्राप्त होणार आहे. परिणामी जास्त दरांच्या निविदेचा वाढीव आर्थिक बोजा महानगरपालिकेस सोसावा लागणार आहे.

	लघुत्तम निविदाकाराचे नांव	निविदेतील दर		वाटाघाटीनंतर कमी केलेले दर	
		निविदेची किंमत	Per Sq. mtr	निविदेची किंमत	Per Sq. mtr
पॅकेज J1	Shayona Corporation & Toscano Infrastructure Pvt Ltd.	१२७२७८५८९६.००	२३६७१.०२	**१०६७३३०५३०.००**	**१९८५०.००**
पॅकेज J2	Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd,	१०५७३५३८९५.९६	२३१२१.००	**९३३०५६१६२.७७**	**२०४०३.००**
पॅकेज J3	Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction	१०८४१५९३३१.००	२३०७०.००	**९३२८३७५६९.६०**	**१९८५०.००**
काशी चर्च	D.K Infrastructures Pvt. Ltd., Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd,	४७५४६७५८१.१०	२२९८०.५४	**३७२४२००९०.००**	**१८०००.००**

ठेकेदाराने व सल्लागाराने जास्त निविदेचे दर असण्याची कारणे मुख्यतव्ये खालीलप्रमाणे नमुद केलेली आहेत.

१) सिमेंट, स्टील, पेट्रोल, डिझेल यांची झालेली दरवाढ.

२) निविदेअंतर्गत Transit Camp बांधावा लागणार आहे. त्याची किंमत सुमारे रु. १,५०,०००/- लक्ष प्रती घर एवढी आहे. तथापी प्रकल्पामध्ये Transit Rent रु. ७२,०००/- प्रति घर आहे.

३) निविदेमध्ये Land Development अंतर्गत Hill Cutting फार मोठयाप्रमाणात आहे. प्रकल्प अहवालातील तरतुदीपेक्षा सदर प्रमाण दुप्पटीपेक्षा जास्त आहे.

४) निविदेअंतर्गत सुरक्षा अनामत रक्कम महानगरपालिकेकडे तीन वर्षाकरिता निव्याज राहणार आहे. तसेच ही रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर तीन वर्षाने परत करणार आहे.

५) निविदेअंतर्गत Architecture fee, Permission इ. खर्चाचा समावेश नाही. तसेच मिरा भाईंदर क्षेत्रात पाण्याचे दुर्भिक्ष आहे. परिणामी बांधकामाकरिता लागणारे पाणी दुरुन टॅकरद्वारे आणावे लागणार असल्याने खर्चात वाढ होते.

६) निविदेअंतर्गत Soil Testing, Soil Investigation, Survey, Shifting of Tenement, Quality Control Lab Maintain इ. हया सर्व कामांचा प्रकल्प अहवालात समावेश होत नाही.

नविन दरसुचीनुसार निविदेची Evaluation सल्लागार (PMC) मे. टेक्नो कंन्सल्टंट यांनी करुन सविस्तर दरपृथःकरण मनपास दि.२०/७/२०१० रोजी सादर केले आहे.

BSUP PROJECT UNDER JNNURM AT JANATANAGAR AND KASHI CHURCH IN MIRA BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION

TENDER EVALUATION STATEMENT

1	PROJECT AREA	COMPONENT	KASHI CHURCH.	JANATANAGAR-J1	JANATANAGAR-J2	JANATANAGAR-J3	TOTAL
2	PROJECT COST AS PER DSR 2008-09	BUILDING	261087990.25	593357764.59	510754717.70	519488409.89	1884688882.43
		INFRA	19950427.75	242395384.10	200641524.19	236113576.78	699100912.82
		TOTAL	281038418.00	835753148.69	711396241.89	755601986.67	2583789795.26
3	PROPOSED TENAMENTS.	NOS	471	1336	1156	1173	4136.00
4	BUILT UP AREA OF PROJECT IN SQM	SQ MTRS	20690.005	53769.804	45731.322	46994.336	167185.47
5	FINAL LOWEST BIDDING COST Rs.	Rs	372420090.00	1067330530.00	933056162.77	932837569.60	3305644352.37
6	LOWEST BIDDING COST PER SQ MTRS	Rs	18000.00	19850.00	20403.00	19850.00	19772.32
7	LOWEST BIDDING COST PER SQ FEET	Rs	1672.86	1844.80	1896.19	1844.80	1814.66
8	ESTIMATED COST PER SQ MTRS(2008-09)	BUILDING	12619.04	11035.15	11168.60	11054.28	11273.04
		INFRA	964.25	4508.02	4387.40	5024.30	4181.59
		TOTAL	13583.29	15543.17	15556.00	16078.58	15190.26
10	ESTIMATED COST (2009-10)	BUILDING	245768927.66	638192287.21	548641202.09	558612096.22	1991214513.18
		INFRA	21264192.40	53191627.07	62693313.47	50357741.11	187506874.05
		SPECIAL INFRA	71528807.95	278922030.63	236877742.39	239428371.36	826756952.33
		TOTAL	338561928.02	970305944.91	848212257.95	848398208.68	3005478339.56
11	ESTIMATED COST PER SQ METER (2009-10)	BUILDING	11878.63	11868.97	11997.06	11886.80	11910.21
		INFRA	1027.75	989.25	1370.91	1071.57	1121.55

		SPECIAL INFRA	3457.17	5187.34	5179.77	5094.83	4945.15
		TOTAL	16363.55	18045.55	18547.73	18053.20	17976.91
12	ESTIMATED COST PER SQ FEET(2009-10)	BUILDING	1103.96	1103.06	1114.97	1104.72	1106.90
		INFRA	95.52	91.94	127.41	99.59	104.23
		SPECIAL INFRA	321.30	482.09	481.39	473.50	459.59
		TOTAL	1520.78	1677.10	1723.77	1677.81	1670.72
13	% ABOVE OVER TENDER		32.52	30.10	33.62	25.77	30.16
14	% ABOVE OVER DSR 2009-10		10.00	10.00	10.00	9.95	9.99

योजनेचा प्रकल्प अहवाल मे. पुनीत आर्किटेक यांनी तयार केला होता. प्रकल्प अहवाल मध्ये सन २००८-०९ च्या दरानुसार होता. सन २००९-१० च्या दरामध्ये झालेली वाढ, झोपडपट्टीधारकांना तात्पुत्या निवारासाठी Transit Camp बांधावा लागणार आहे. प्रकल्प अहवालामध्ये Transit Rent घेतलेला आहे. Transit Camp मुळे योजनेच्या किंमतीमध्ये वाढ होत आहे. प्रकल्पामध्ये Land Development (Hill Cutting) एकूण कॉंटीटीच्या ५० टक्केचा समावेश घराची किंमत कमी येण्यासाठी केलेला होता असे मे. पुनीत आर्किटेक यांनी कळविलेले आहे.

वरील सर्व निविदासाठी BSUP प्रकल्पासाठी लागणारा खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1	Total cost of Sanction Project (as per sanction) DSR 08-09	279.55 Cr
2	Gross Cost DPR (As per DSR 09-10)	330.33 Cr
3	Tender invited for project cost	258.37 Cr
4	i) Cost of DPR Component (As per DSR 09-10)	271.99 Cr
	ii) Different of cost Transit Rent and Transit Camp for (50% basis)	14.11 Cr
	iii) Excess and development cost Hill casting not consider in DPR	14.44 Cr
	Total Net Cost	**300.54 Cr**

5	Tender price offer received cost Rs	330.56 Cr
6	Center Govt, State Govt & Ben fishery Share	207.20 Cr
7	Municipal Corporation Share	123.36 Cr

BSUP प्रकल्पाच्या एकूण जागेच्या २५ % जागा व्यापारी प्रयोजनासाठी वापर करुन मनपा हिस्स्यातील काही खर्च भागविण्यासाठी म्हाडाकडे मनपामार्फत प्रस्ताव सादर केलेला आहे. वरील तुलनात्मक तक्त्यामधील ठेकेदारानी दिलेले Revised price offer (तुलनात्मक तक्ता अ.क्र ६) सन २००९-१० च्या दरापैक्षा १० % जास्त असले तरी दर स्पर्धात्मक आहेत. सदर दर मंजुरीची शिफारस सल्लागार मे. टेक्नो कंन्सल्टंट यांनी देखिल केली आहे. सदर निविदांमधील दर कमी करुन घेण्यात आले आहे. सदर कमी करुन आलेल्या खालील दरांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

	लघुत्तम निविदाकाराचे नांव	वाटाघाटीनंतर कमी केलेले दर	
		निविदेची किंमत	Per Sq. mtr
पॅकेज J1	Shayona Corporation & Toscano Infrastructure Pvt Ltd.	१०६७३३०५३०.००	१९८५०.००
पॅकेज J2	Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd,	९३३०५६१६२.७७	२०४०३.००
पॅकेज J3	Bitcon India infrastructure Developers (P) Ltd. & Shreeji Construction	९३२८३७५६९.६०	१९८५०.००
काशीचर्च	D.K Infrastructures Pvt. Ltd., Sumer Corporation , S.V.Jiwani & Stresscreete India Ltd,	३७२४२००९०.००	१८०००.००

तसेच निविदेतील अटीशर्ती व निविदापूर्व बैठकतील निर्णयानुसार Mobilization Advance १० % देण्यास हि सभा मंजूरी देत आहे.

सदर काम BSUP अंतर्गत प्रस्तावीत असल्याने निविदा मंजुरीनुसार प्रत्यक्षात होणाऱ्या खर्चाकरिता सन २०११-२०१२ तसेच २०१२-२०१३ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मंजूर निविदांनुसार अपेक्षित रु. ३३०.५६ कोटीच्या सुधारित खर्चास देखील हि सभा मंजुरी देत आहे.

सदर निविदा बाबत त्वरीत योग्य अटीशर्तीचा करारनामा करण्यास व ठेकेदारास कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच BSUP मधील लाभार्थ्यांची यादी निश्चित करणे, लाभार्थ्यांना तात्पुरते राहण्यासाठी Transit Camp किंवा Transit Rent देणे बाबतची स्वतंत्र नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहे. तसेच BSUP प्रकल्पाचा २५ % जागा व्यापारी प्रयोजनासाठी वापर करुन मनपा हिस्सातील काही खर्च भागविण्यासाठी सदर जागेबाबत आवश्यक ती प्रक्रिया व कार्यवाही करण्यासाठी मा. आयुक्त यांना प्राधिकृत करुन मान्यता देण्यात येत आहे. तसेच निविदा मधील अटीशर्ती व करारनाम्यातील अटीशर्तीनुसार ठेकेदारास वेळोवेळी देयके प्रदान करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्रीम. निर्मला सावळे – कांबळे.

अनुमोदक :- श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन.

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

JNNRUM/CON/SW/TI

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दिनांक : ०५/०८/२०१०

(दि. २६/०७/२०१० रोजीची तहकुब सभा)

// ठराव //

प्रकरण क्रमांक : (३७)

ठराव क्रमांक : (३२)

विषय :- मिरा-भाईंदर महानगरपालिका अग्निशमन दलाकरिता दोन लहान टाटा ४०७/३१०० चेसिसवर मिनी फायर टेंडर बॉडी बांधणेबाबत.

प्रकरण क्र. ३७ च्या गोषवाऱ्यानुसार मे. हायटेक सर्विसेस ह्यांचे दर सर्वात कमी आहेत. तेव्हा २ नग वॉटर टेंडर रु. ३०,६१,८००/- ह्याप्रमाणे २ नग मिनी वॉटर टेंडर बॉडी बांधणेकामी व त्या वाहनासोबत अतिरिक्त साहित्य पुरवठा करणेकामी रु. २१,१७,०००/-ह्या दराने २ नग वॉटर टेंडर बॉडी बांधून व त्यासोबतच्या अतिरिक्त साहित्यासह ४ महिन्याच्या मुदतीत पुरविणेकामी तसेच सदरचे काम मुदतीत पार न पाडल्यास प्रति दिन रु. ५,०००/- याप्रमाणे विलंब शुल्क आकारण्यात यावे अशा सूचनेसह हि स्थायी समिती सभा कमी दराच्या मे. हायटेक सर्विसेस ह्यांच्या निविदेस मंजूरी देत आहे.

सुचक :- (चंद्रकांत वैद्य)

अनुमोदक :- (सौ. अनिता पाटील)

सभापती

ठराव सर्वानुमते मंजूर

मिरा-भाईदर महानगरपालिका

69

मा. स्थायी समिती सभा दि.०५/०८/२०१०

(दि. २६/०७/२०१० रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. (३८) :- निविदांना मान्यता देणे बाबत.

ठराव क्रमांक (33) :-

अ.क्र.	कामाचे नांव /ठेकेदाराचे नांव	अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर
१	मिरा-भाईदर महानगरपालिका हद्दीतील भाईदर (पूर्व) खारीगांव शाळेकरीता वाढीव पहिला, दुसरा व तिसरा मजल्याचे उर्वरीत बांधकाम करणे. भाग – २	रु. ४९,९९,८००/-
	१) मे. ललित इंटरप्रायजेस	७४.00 % जास्त दराने
	दर कमी करून (सन २००९ – १० च्या जिल्हादरसुचीतील दरानुसार)	७0.00 % जास्त दराने (१६.३९ % जास्त दराने)

अ.क्र.	कामाचे नांव /ठेकेदाराचे नांव	अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर
२	भाईदर (प) येथील महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीवर शेड बांधणे.	रु. १८,४३,७००/-
	१) मे. साळवी कंन्स्ट्रक्शन २) मे. कल्पतरू इंटरप्रायजेस	८.00 % कमी दराने 0.0१ % कमी दराने
३	भाईदर (पूर्व) ओस्वाल ऑर्नेट पासून युनायटेड पॅलेस पर्यंत रस्ता तयार करणे.	रू. १४,३१,३००/-
	मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या.	**अंदाजपत्रक दराने**

वरीलपैकी अ.क्र. २ च्या कामी मे. साळवी कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ८% कमी दराची निविदास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र. १ च्या कामाचे अंदाजपत्रकातील दर हे सन २००५ – ०६ या वर्षाच्या दरसुचीतील असून त्यानुसार एकूण रू. ४९,९९,७७७/- रकमेचे अंदाजपत्रक होत आहे.

तथापी सद्यस्थितीत सन २००९ – १० या वर्षाचे जिल्हा दरसुचीतील दर उपलब्ध असून त्यानुसार सदर अंदाजपत्रक रू. ७३,०२,५०९/- रकमेचे असल्याबाबत तांत्रिक सल्लागार मे आर्किझाम कंन्सी

कळविलेले आहे. प्रत्यक्षात ठेकेदाराने सन २००५ – ०६ या वर्षाच्या जिल्हादरसुचीतील दरानुसार दरवाटाघाटीनंतर ७०.०० % जास्त दर सादर केले आहेत. सदर दराची तुलना सन २००९ – १० या वर्षाच्या जिल्हा दरसुचीतील दराशी करता ठेकेदारानी भरलेले दर १६.३९ % जास्त दराची आहे. सदर निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र. ३ चे काम तातडीचे असल्याने जिल्हा मजूर सोसायटी कडून आलेल्या शिफारसीनुसार मे. गांवदेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या यांना कार्यादेश देउन सुरू करण्यात आलेले आहे. सदर निविदेस मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामी ठेकेदारांना वेळोवेळी देयके प्रदान करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री सुबेर इनामदार

अनुमोदन :- श्री शेख फॅरो

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

10-11/DKV/DK/ T 8

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. 5/1/2010.

(टि. 28/06/2010 रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र. 80

ठराव क्र. 35

विषय :- **मिरारोड येथील रक्तपेढीसाठी आलेले निविदांचे दर मंजूर करणेबाबत.**

प्रशासनाने दिलेल्या गोषवाऱ्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरक्षण क्र. १९२, १९३ मध्ये रूग्णालयाच्या इमारतीत तळ मजल्यावर रक्तपेढी सुरू करण्यासाठी मे. नवजीवन मेडिकल रिलीफ ॲण्ड रिसर्च फाऊंडेशन यांनी सादर केलेल्या कमी दराच्या निविदेस मा. स्थायी समिती सभा खालीलप्रमाणे अटीशर्तीच्या अधीन राहून मंजूरी देत आहे.

१) कार्यादेशापासून चार महिन्याचे आत रक्तपेढी सुरू करण्यात यावी.

२) उपकरणे नादुरूस्त झाल्यास दुरूस्ती तत्काळ करून घ्यायची जबाबदारी संस्थेची राहील. तसेच कुठल्याही परिस्थितीत रूग्णास रक्तपुरवठा करण्यात यावा.

३) रक्तपेढी चालविण्यासाठी संस्थेने योग्य पात्रतेचे FDA Approved अधिकारी व कर्मचारी वर्ग यांची नेमणूक करावी.

४) सदर रक्तपेढी चालविण्याची मुदत १० वर्षे राहील. त्यानंतर काम समाधानकारक वाटल्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार मा. आयुक्त सो. यांना राहील.

५) रक्तपेढी साहित्य उपकरणे व कर्मचारी वर्ग भरती केल्यानंतर आवश्यक परवाने घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

६) उच्च प्रतीचे रक्त गरजु रूग्णास कोणत्याही परिस्थितीत पुरविण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

७) रक्तपेढीबाबत येणारे सर्व आधुनिक तंत्रज्ञान आणण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

८) रक्तपेढी चालविण्यासाठी महानगरपालिकेतर्फे जागा, नळजोडणी, अखंडीत विद्युत पुरवठा, दुरध्वनी जोडणे, वातानुकुलीन यंत्रणा पुरवठा केले जाईल. याबाबतचे येणारे मासिक व वार्षिक देयक मात्र संस्थेस भरावे लागेल.

९) शासकीय नियमाचे उल्लघंन झाल्यास अथवा जागेचा दूरउपयोग झाल्यास झालेला करार रद्द करण्यात येईल.

१०) रक्तपेढीसाठी अन्न व औषध प्रशासनाने तयार केलेल्या नियमामध्ये सदर रक्तपेढी चालविली पाहिजे. त्या नियमांचे उल्लंघन केल्यास संपूर्णपणे सदर संस्था जबावदार राहील.

११) महानगरपालिकेने वेळोवेळी केलेल्या सुचनांचे उल्लंघन केल्यास करारनामा रद्द करण्यात येईल.

१२) रक्तपेढी चालविण्यास लागणारा अत्यावश्यक असा परवाना व नुतनीकरण अन्न व औषध प्रशासन यांच्याकडून आणण्याची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

१३) सदर परवाना प्राप्त करण्यासाठी लागणाऱ्या सर्व कागद पत्राची पुर्तता सदर संस्थेला करावयाची आहे.

१४) रक्तपेढीस लागणाऱ्या सर्व यंत्रांची देखभाल सदर संस्थेला करावयाची आहे. त्यासाठी लागणारा सर्व प्रकारचा खर्च सदर संस्थेलाच करावयचा आहे. यंत्राची दुरूस्ती लवकरात लवकर करून घ्यायची जबाबदारी सदर संस्थेवर राहील. यंत्र नादुरूस्त असताना कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी संस्थेवर राहील.

१५) रक्तपेढीतील यंत्रांसाठी व वेळोवेळी लागणाऱ्या रसायनांची, द्रावणांची तसेच इतर आवश्यक साहित्य खरेदी संस्थेला करावयाची आहे.

१६) निवडलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्याचे त्यांच्या पदानुसार व किमान वेतन कायद्यानुसार मासिक पगार देणे सदर संस्थेस बंधनकारक राहील.

१७) रक्तपेढीत काम करावयास निवडलेल्या प्रत्येक उमेदवाराचे कामाचे तास, कामाची वेळ ठरविण्याचा अधिकारी संस्थेवर राहील.

१८) रक्तपेढीतील कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक किंवा लेखी चुकाच्या परिणामाला, कायदेशीर कारवाईला संस्था जवावदार राहील. या संबंधीची कुछलीही जबाबदारी कुठल्याही प्रमाणात महानगरपालिका स्विकारणार नाही.

१९) अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीला सामोरे जायची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील. त्या तपासणीत आढळणाऱ्या त्रृटींना परिपूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

२०) अकस्मित होणाऱ्या, उद्‌भवणाऱ्या संकटाना म्हणजे बंद, दंगल, अतिवृष्टी, संप या सारख्या परिस्थितींना सामोरे जायची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

२१) रक्तदान शिबीर आयोजित करून, रक्त जमा करण्याची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील. रक्तदान शिबिराला लागणारी साधन सामुग्री, मनुष्यबळ, वाहन व इतर आवश्यक साहित्य संस्थेनेच खरेदी करावे.

२२) रक्तपेढीत जमा होणाऱ्या रक्तावर नियमानुसार करावयाला लागणाऱ्या विविध चाचण्यासाठी उच्च व आधुनिक तंत्र व यंत्र वापरण्याची जबाबदारी सदर संस्थेवर रहील.

२३) दुषित व खराब झालेले व न वापरलेले रक्त व रक्तघटकांची बायोमेडिकल वेस्ट ॲक्ट १९९८ नुसार विल्हेवाट लावण्याची सर्व जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

२४) अन्न व औषध प्रशासनाच्या नियमानुसार रक्तपेढी सर्व प्रकारचे अहवाल ठेवण्याची जबाबदारी सदर संस्थेवर राहील. अहवाल गहाळ किंवा खराब झाल्यास सदर संस्थेला पूर्णपणे जबाबदार धरण्यात येईल.

२५) रक्तपेढी सुरू झाल्यानंतर होणाऱ्या सर्व प्रकारच्या अंतर्गत दुरूस्तीचा खर्च सदर संस्थेला करावयाचा आहे.

२६) रक्तपेढीच्या नित्य वापरावयाच्या गोष्टी उदा. रक्तांच्या पिशव्या चाचणी संच, रसायन, द्रावणे यांचा पुरेसा साठा ठेवण्याची सर्व जबाबदारी सदर संस्थेवर राहील.

२७) रक्तपेढी चालविताना त्याची संपूर्ण नैतिक जवाबदारी कायदेशीररित्या सदर संस्थेवर राहील.

२८) अशासकीय संस्थेने रू. १ लाखाची बँक गॅरेंटी महापालिकेस देणे बंधनकारक आहे.

२९) संस्थेने महापालिकेची जागा वापराबद्दलचे रू. २५०००/- मनपा फंडात प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत भरावे.

३०) थॅलेसेमिया, रक्ताचा कर्करोग व बीपीएल दाखला असणाऱ्यांना संस्थेने मोफत रक्तपुरवठा करावा.

३१) भविष्यात केंद्र शासन, राज्य शासन, महानगरपालिकेने वेळोवेळी केलेले कायदे, आदेश पाळणे संस्थेस बंधनकारक राहील.

३२) रक्तपेढीतून दिलेल्या रक्तात काहीही दोष आढळल्यास किंवा रक्त खराब आहे असे सिध्द झाल्यास तीन नोटीसीनंतर आपल्याशी झालेला करारनामा रद्द करण्यात येईल, व बँक गॅरेंटी जप्त करण्यात येईल. तसेच यानंतर होणाऱ्या सर्व कार्यवाहीला संस्था जबाबदार राहील.

३३) या करार कालावधीत कराराच्या अमंलबजावणी संदर्भात काही तंटा उद्‌भवल्यास तो भारतीय लवाद कायदा १९४८ अंतर्गत सोडविण्यात यावा.

सूचक -

अनुमोदक -

मा.सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.५/८/२०१०

(दि.२६/७/२०१० रोजीची तहकुब सभा)

प्रकरण क्र.६१:- भाईंदर (पश्चिम), भाईंदर (पुर्व), मिरारोड ते चेणा, मुर्धा ते उत्तन या विभागातील बाजार बोली पध्दतीने स्विकारणे बाबत (१२ महिन्याकरिता)

ठराव क्र.३६:-

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (पश्चिम) आणि भाईंदर (पुर्व) या विभागाकरिता १२ महिन्याच्या कालावधीसाठी बाजार फी वसुलीकरिता अभिकर्ता (एजंट) नेमणेकरिता किमान देकाराची रक्कम खालीलप्रमाणे ठरविण्यांत आलेली आहे.

अ. क्र.	विभाग	सन २००९-१० च्या देकाराची रक्कम	नैसर्गिक वाढ १०%
१)	भाईंदर (पश्चिम)	रु.१,०९,२५,०००/-	रु. १,२०,१७,५००/-
२)	भाईंदर (पुर्व)	रु.१,१४,०५,०००/-	रु. १,२५,४५,५००/-

त्याप्रमाणे १) दि.२८/१/२०१० "दै. लोकसत्ता", "हिदुस्थान टाईम्स" व "समाधी प्रकाश" २) दि.१९/२/२०१० "लोकसत्ता" व "हिदुस्थान टाईम्स" ३) दि.६/४/२०१० महानगर, दै. फ्री प्रेस जनरल ४) ७/४/२०१० महाराष्ट्र टाईम्स (शुध्दीपत्र) दि.१०/४/२०१० या वृत्तपत्रात E-Auction व्दारे जाहीर निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द केल्यानंतर मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या **www.mbmc.abcprocure.com** या संकेतस्थळावर वरील दिलेल्या देकार रक्कमेची रक्कम भरुन लिलावात भाग घेणे आवश्यक होते परंतु कोणत्याही ठेकेदाराने संकेतस्थळावर देकार रक्कम न भरल्याने सदर बाजार लिलाव हा जाहीर बोली पध्दतीने द्यावयाचे ठरले व याकरिता दि.२८/०५/२०१० "दै. वार्ताहर" व "दै. फ्री प्रेस जनरल" या वृत्तपत्रात जाहीरात देऊन दि.७/६/२०१० रोजी मा.आयुक्त सो. यांच्या दालनात दुपारी २.०० वाजता बोली पध्दतीने बाजार लिलाव भाईंदर (पुर्व) व भाईंदर (पश्चिम) या विभागाकरिता ठेवण्यांत आला होता.

भाईंदर (पुर्व) करिता महानगरपालिकेने निश्चित केलेली बोली रक्कम रु.१,२५,४५,५००/- व भाईंदर (पश्चिम) करिता बोली रक्कम रु.१,२०,१७,५००/- इतकी निश्चित करण्यांत आली होती.

भाईंदर (पुर्व) करिता १) मे. ललित इंटरप्रायझेस, २) श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा, ३) मे. गौरव कंस्ट्रक्शन, ४) श्री. विजयकुमार सोमानी व ५) श्री. देविदास जयदेव किणी हे इच्छुक उपस्थित होते. सदर इच्छुकांनी पुकारलेली बोली रक्कम पुढीलप्रमाणे होती.

अ.क्र.	बोली धारकांचे नांव	पुकारलेली बोली रक्कम
१)	मे. ललित इंटरप्रायझेस	६६,००, ०००/-, ७०,००,०००/-, ७१,५०,०००/-, ७३,००,०००/-, ७६,००,०००/-
२)	श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा	६०,००,०००/-, ६७,००,०००/-, ७२,००,०००/-, ७५,००,०००/-, ७५,००,०००/-
३)	मे. गौरव कंस्ट्रक्शन	८०,००,०००/-, ८२,००,०००/-, ८४,००,०००/-
४)	श्री. विजयकुमार सोमानी	६५,००,०००/-, ६८,००,०००/-, ७१,००,०००/-, ७४,००,०००/-, ७७,००,०००/-, ८१,००,०००/-, ८३,००,०००/-, ८५,००,०००/-
५)	श्री. देविदास जयदेव किणी	५०,००,०००/-, ६५,००,०००/-

वरीलप्रमाणे बोली रक्कमेपैकी सर्वात जास्त बोलीची रक्कम **श्री. विजयकुमार सोमानी** यांची असून ती रक्कम रु.८५,००,०००/- इतकी होती व ती रक्कम महानगरपालिकेने निश्चित केलेल्या रक्कम रु.१,२५,४५,५००/- पेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो., यांनी ती रक्कम अमान्य केली.

भाईंदर (पश्चिम) करिता १) श्री. देविदास जयदेव किणी, २) श्री. विजयकुमार सोमानी, ३) श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा, ४) मे. ललित इंटरप्रायझेस हे इच्छुक उपस्थित होते. सदर इच्छुकांनी पुकारलेली बोली रक्कम खालीलप्रमाणे होती.

अ.क्र.	बोली धारकांचे नांव	पुकारलेली बोली रक्कम
१)	श्री. देविदास जयदेव किणी	५०,००,०००/-, ६६,००,०००/-, ७०,१०,०००/-, ७५,१०,०००/-
२)	श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा	६०,००,०००/-, ७०,००,०००/-, ७५,००,०००/-, ७६,००,०००/-
३)	मे. ललित इंटरप्रायझेस	६५,००,०००/-
४)	श्री. विजयकुमार सोमानी	----

उक्त बोली रक्कमेपैकी सर्वात जास्त बोलीची रक्कम **श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा** यांची असून ती रक्कम रु.७६,००,०००/- इतकी होती व ती रक्कम महानगरपालिकेने निश्चित केलेल्या रक्कम रु.१,२०,१७,५००/- पेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो., यांनी ती रक्कम अमान्य केली.

भाईंदर (पुर्व) व भाईंदर (पश्चिम) प्रभागातील बाजार शुल्क वसुल करण्याच्या लिलावाच्या प्राप्त झालेल्या बोलीची रक्कम महानगरपालिकेने निश्चित केलेल्या रक्कमेपेक्षा कमी असल्याने मा. आयुक्त सो., यांनी त्या रक्कमा अमान्य केल्या. सबब या कामी फेर निविदा मागविण्यांस शिफारस केली, त्याप्रमाणे दि.१५/६/२०१० रोजी "दै. फ्री प्रेस जनरल" व दि.१६/६/२०१० "महाराष्ट्र टाईम्स" मध्ये जाहीरात देऊन दि.१८/६/२०१० रोजी मा.आयुक्त सो., याच्या दालनात बोली पध्दतीने लिलाव ठेवण्याची तारीख निश्चित केलेली होती. परंतु बाजार लिलाव २२/६/२०१० रोजी मा. आयुक्त सो. यांच्या दालनात संध्या.४.०० वाजता ठेवण्यांत आला होता.

भाईंदर (पश्चिम) करिता अनुक्रमे १ ते ७ या ठेकेदारांनी भाग घेतला असून सदर इच्छुकांनी पुढीलप्रमाणे बोली पुकारलेली आहे.

अ. क्र.	लिलावात भाग घेणा-याचे नांव व पत्ता भाईंदर (पश्चिम)	लिलावात भाग घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जाची दिनांक	पुकारलेल्या बोलीची रक्कम
१	मे. विराज कन्स्ट्रक्शन (प्रो. श्री. विराज पाटील) जी/२, गोदावरी अपार्टमेंट, नवघर, भाईंदर (पुर्व)	१८/६/२०१०	रु. ६६/- लाख
२	मे.एस.एस. एंटरप्राईज २०८, मोठया क्रॉस जवळ, उत्तन गांव, भाईंदर (पश्चिम)	१८/६/२०१०	रु. ७८.५०/- लाख
३	श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा जी/१, श्री गजानन प्रसन्न अपार्टमेंट, आईस फक्टरी जवळ, भाईंदर (पश्चिम)	१८/६/२०१०	रु. ७७/-लाख रु. ८०/-लाख रु. ८४/-लाख
४	मे. ललित एंटरप्रायजेस गंधर्वराज अपार्टमेंट, खारीगांव, भाईंदर (पुर्व)	१८/६/२०१०	रु. ७६.५०/- लाख रु. ७९/- लाख
५	श्री. देविदास जयदेव किणी १०२ एकविरा अपार्टमेंट, राम मंदिर रोड, भाईंदर (पश्चिम)	१८/६/२०१०	रु. ७०/- लाख रु. ८२/- लाख रु. ८५/- लाख
६	मे. गौरव कन्स्ट्रक्शन २०३, आशिष अपार्टमेंट, राम मंदिर रोड, भाईंदर (पश्चिम)	१८/६/२०१०	रु. ७७.५०/- लाख
७	श्री. विजयकुमार गजाधर सोमानी सी/११, गौतम नगर क्र.१, अंबे माता मंदिर रोड, मोती नगर, भाईंदर (पश्चिम)	१८/६/२०१०	रु. ७८/-लाख रु. ८३/-लाख

भाईंदर (पुर्व) करिता अनुक्रमे १ ते ५ या ठेकेदारांनी भाग घेतला असून सदर इच्छुकांनी पुढीलप्रमाणे बोली पुकारलेली आहे.

अ. क्र.	लिलावात भाग घेणा-याचे नांव व पत्ता भाईंदर (पुर्व)	लिलावात भाग घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जाची दिनांक	पुकारलेल्या बोलीची रक्कम
१	मे. विराज कन्स्ट्रक्शन (प्रो. श्री. विराज पाटील) जी/२, गोदावरी अपार्टमेंट, नवघर, भाईंदर (पुर्व)	१८/६/२०१०	रु. ७५/- लाख रु.८८/- लाख
२	मे.एस.एस. एंटरप्राईज २०८, मोठया क्रॉस ज़वळ, उत्तन गांव,भाईंदर (पश्चिम)	१८/६/२०१०	रु. ७९/- लाख रु.९२.५० लाख
३	श्री. देविदास जयदेव किणी १०२ एकविरा अपार्टमेंट, राम मंदिर रोड, भाईंदर (पश्चिम)	१८/६/२०१०	रु. ८०/- लाख रु.८६.५० लाख रु.९४.५० लाख
४	मे. गौरव कन्स्ट्रक्शन २०३, आशिष अपार्टमेंट, राम मंदिर रोड, भाईंदर (पश्चिम)	१८/६/२०१०	रु. ८२/- लाख रु.९०/- लाख
५	श्री. विजयकुमार गजाधर सोमानी सी/११, गौतम नगर क्र.१, अंबे माता मंदिर रोड, मोती नगर, भाईंदर (पश्चिम)	१८/६/२०१०	रु. ८५/- लाख रु.८६/- लाख रु.९२/- लाख रु.९४/- लाख रु.९५/- लाख

तसेच महानगरपालिका क्षेत्रातील **मिरारोड ते चेणा व मुर्धा ते उत्तन चौक** या विभागाकरिता बाजार लिलावाची मुदत दि. ३०/६/२०१० रोजी संपत असल्याने सदर बाजार लिलाव घेण्याचे निश्चित करण्यांत आले व या दोन्ही विभागाची सन २०१०-११ या वर्षाकरिता बाजार देकाराची रक्कम पुढीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	विभाग	सन २००९-१० च्या देकाराची रक्कम	नैसर्गिक वाढ १०%
१)	मिरारोड ते चेणा	रु.१,३८,००,०००/-	रु. १,५१,८०,०००/-
२)	मुर्धा ते उत्तन	रु. ४,३०,०००/-	रु. ४,७३,०००/-

सदर बाजार लिलाव बोली पध्दतीने घेण्याकरिता दि.९/६/२०१० रोजी "दै. फ्री प्रेस जनरल" व "लोकमत" या वृत्तपत्रात जाहीरात देऊन दि.१९/६/२०१० रोजी मा.आयुक्त सो., यांच्या दालनात बोली पध्दतीने बाजार लिलाव घेण्याचे ठरले होते. परंतु हा बाजार लिलाव २२/६/२०१० रोजी मा. आयुक्त सो. यांच्या दालनात संध्या.४.०० वाजता ठेवण्यांत आला होता. या लिलावामध्ये खालीलप्रमाणे देकार बोली पध्दतीने पुकारण्यांत आले.

मिरारोड ते चेणा करिता अनुक्रमे १ ते ५ या ठेकेदारांनी भाग घेतला असून सदर इच्छुकांनी पुढीलप्रमाणे बोली पुकारलेली आहे.

अ. क्र.	लिलावात भाग घेणा-याचे नांव व पत्ता मिरारोड ते चेणा	लिलावात भाग घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जाची दिनांक	पुकारलेल्या बोलीची रक्कम
१	श्री. विजयकुमार गजाधर सोमानी सी/११, गौतम नगर क्र.१, अंबे माता मंदिर रोड, मोती नगर, भाईंदर (पश्चिम)	२१/६/२०१०	रु. ८८/- लाख रु.९५/- लाख
२	मे. विराज कन्स्ट्रक्शन (प्रो. श्री. विराज पाटील) जी/२, गोदावरी अपार्टमेंट, नवघर, भाईंदर (पुर्व)	२१/६/२०१०	रु. ९५.५०/- लाख
३	मे.एस.एस. एंटरप्राईज २०८, मोठया क्रॉस जवळ, उत्तन गांव,भाईंदर (पश्चिम)	२१/६/२०१०	रु. ८०/- लाख रु.९९.५० लाख
४	श्री. सायमन बस्त्याव अल्मेडा जी/१, श्री गजानन प्रसन्न अपार्टमेंट, आईस फक्टरी जवळ, भाईंदर (पश्चिम)	२१/६/२०१०	रु.८७/- लाख **रु.१ कोटी ५/-लाख**
५	मे. गौरव कन्स्ट्रक्शन २०३, आशिष अपार्टमेंट, राम मंदिर रोड, भाईंदर (पश्चिम)	२१/६/२०१०	रु.९०/- लाख

मुर्धा ते उत्तन करिता अनुक्रमे १ ते २ या ठेकेदारांनी भाग घेतला असून सदर इच्छुकांनी पुढीलप्रमाणे बोली पुकारलेली आहे.

अ. क्र.	लिलावात भाग घेणा-याचे नांव व पत्ता मुर्धा ते उत्तन	लिलावात भाग घेण्यासाठी सादर केलेल्या अर्जाची दिनांक	पुकारलेल्या बोलीची रक्कम
१	मे. विराज कन्स्ट्रक्शन (प्रो. श्री. विराज पाटील) जी/२, गोदावरी अपार्टमेंट, नवघर, भाईंदर (पुर्व)	२१/६/२०१०	रु.३/- लाख रु.४/- लाख
२	मे. राठोड असोसिएट (प्रो. श्री. वसंतभाई ए. राठोड)	२१/६/२०१०	रु.४/- लाख१० हजार

बाजार लिलावात भाग घेणा-या चारही ठेकेदारांनी खालीलप्रमाणे अंतिम बोली पुकारलेली आहे.

१) भाईंदर (पुर्व) रु.९५ लाख

२) भाईंदर (पश्चिम) रु.७६ लाख

३) मिरारोड ते चेणा रु. १ कोटी ५ लाख

४) मुर्धा ते उत्तन ४ लाख १० हजार

ठेकेदारानी पुकारलेली बोली महानगरपालिकेने ठरविलेल्या देकार रक्कमेपेक्षा कमी आहे. या पुकारलेल्या रक्कमेबाबत ठेकेदाराना विचारणा केली असता बाजार लिलावाची रक्कम किमान देकारापर्यंत पुकारण्यांत यावी असे प्रशासनाकडून सांगितले, तसेच उपस्थित असलेले मा. स्थायी समिती सदस्य व मा. सभापती सो. यांनी ठेकेदाराने पुकारलेली रक्कम फारच कमी असल्याची चर्चा झाली.

बाजार लिलावाची देकार रक्कम व महानगरपालिका व पोलिस प्रशासनकडून फेरीवाल्यावर सातत्याने होणारी कारवाई व त्यात होणारे ठेकेदाराचे आर्थिक नुकसान या बाबत ठेकेदाराने आपले निवेदन उपस्थितापुढे मांडले.

बाजार ठेकेदारानी मा. आयुक्त सो., मा. सभापती स्थायी समिती व उपस्थित स्थायी समिती सदस्य यांचे पुढे निवेदन व्यक्त केल्यानंतर मा. आयुक्त सो., यांनी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून बाजार लिलावात भाग घेणा-यांना बाजार ठेकेदारांना सूचित केले सन २००९-१० च्या बाजार रक्कमेवर १०% वाढ घेऊन बाजार लिलाव घेणे बाबत ठेकेदारांना सूचना केल्या. या सूचनेवर लिलावात भाग घेणा-या ठेकेदारानी आम्ही केलेली बोली ही बरोबर आहे ती मान्य करावी अशी विनंती केली. या सूचनेवर मा. आयुक्त सो., यांनी बाजार लिलाव हा ठरलेल्या देकार रक्कमेप्रमाणे घ्यावा लागेल असे सांगितले. या सूचनेवर उपस्थित असलेले मा. सभापती सो., मा. स्थायी समिती सदस्य व बाजार ठेकेदार यांच्याबरोबर लिलावाच्या बोलीच्या रक्कमेबाबत चर्चा होऊन बाजार लिलाव धारकांनी सन २००९-१० या वर्षातील रक्कमेवर ५% वाढ देऊन बाजार लिलाव घेण्यास तयारी दर्शविली ती पुढीलप्रमाणे आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. ५ / ८ /२०१०
(दि. २६/०७/२०१० रोजीची तहकुब सभा)
// ठराव //

प्रकरण क्र. :- ४२ महापालिकेच्या वाहनांच्या लिलावाद्वारे विक्री केल्याबाबत...

ठराव क्र. ३७

मिरा भाईंदर महानगरपालिकेची १० वर्षापेक्षा जास्त कालावधीची एकुण १५ वाहनांचा लिलावाद्वारे विक्री करणे करिता दि. २९/०६/२०१० रोजीच्या मा. महासभेत याबाबत चर्चा करुन सर्वानुमते ठराव क्र. १५ दि. २९/६/२०१० अन्वये एकुण १५ वाहने विक्री करणेबाबत आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मा. महासभेने दिलेली आहे.

त्यानुसार दि. १३/७/२०१० रोजी मा. आयुक्त सो., यांच्या दालनात बोली पध्दतीने जाहिर लिलाव ठेवण्यात आला होता. सदरच्या लिलावात २७ जणानी निविदा फार्म घेतले व एकुण २२ जणानी बोली लिलावात भाग घेतला.

सदर लिलावात मा. आयुक्त सो., यांच्या दालनात मा. आयुक्त सो., समवेत मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता, मा. सभापती स्थायी समिती, मा. सदस्य स्थायी समिती, मा. सर्व गटनेते यांना बोलविण्यांत आले होते.

एकुण १५ वाहनांची देकार रु. ५, २०, ०००/- पासुन सुरुवात झाली. सर्वात जास्त बोली मे. सिमरन इंटरप्रायजेस यांनी रु. १७,००,०००/- बोली करण्यात आली तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये केलेल्या लिलावाच्या प्राप्त रक्कम रु. १७,००,०००/- मान्यता मिळणेस ही सभा मंजुरी देत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

सुचक :-

अनुमोदन :-

सभापती
स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा

दिनांक :- ०५/०८/२०१०

(दि. २६/०७/२०१० रोजीची तहकुब सभा)

|| ठराव ||

प्रकरण क्र. ४३ :- मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाच्या बसेस सार्वजनिक व खाजगी सहभागातून चालविणे करीता प्राप्त निविदांपैकी कमी दराच्या निविदेस मंजुरी देणेबाबत.

ठराव क्र. ३८ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाची स्थापना मा. महासभा दि. २०/०१/२००५ रोजी ठराव क्र. ६२ अन्वये करणेत आलेली होती. तद्नंतर मा. महासभा दि. १८/०२/२००५ ठराव क्र. ७२ अन्वये परिवहन समितीची स्थापना करण्यात आली.

परिवहन समिती सभा दि. ०४/०६/२००५ ठराव क्र. ०५ अन्वये परिवहन उपक्रम खाजगी तत्वावर चालविण्याची मंजुरी देण्यात आली. परिवहन उपक्रमाने निविदा प्रक्रिया करुन प्रती कि.मी. दर मागविले, त्यामध्ये एकूण तीन निविदा धारकांनी प्रत्यक्ष भाग घेतला. सर्वात कमी दर मे. महालक्ष्मी कृपा इन्फ्रा. प्रा. लि. यांचे प्रती कि.मी. दर रु. १९/- प्रमाणे निश्चित करण्यात आले व दि. १५/०९/२००५ पासून मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाची बस सेवा सुरु झाली.

सन २००५ ते आजपर्यंत परिवहन उपक्रम चालविण्यासाठी महानगरपालिकेकडून मिळालेले अनुदान खालीलप्रमाणे आहे.

आकडे लाखात

२००५-०६	२००६-०७	२००७-०८	२००८-०९	२००९-१०	२०१०-११ (माहे जून पर्यंत)	एकूण
५५.५४	१२०.००	१७०.००	१०५.००	२२५.००	६०.००	७३५.५४

मागील पाच वर्षापर्यंत मिळालेले अनुदान पाहता ७.३५ कोटी एवढे अनुदान मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून परिवहन सेवा चालविण्यासाठी परिवहन उपक्रमाला दिलेले आहे. वरील बाबींचा विचार करता परिवहन उपक्रमास होणारा तोटा हा वाढत चालललेला आहे असे दिसून येते.

सन २००९ या वर्षात केंद्र शासनाची JNNURM योजने अंतर्गत शहर परिवहनसाठी बसेस उपलब्ध करुन घेणेसाठी मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०५/२००९, ठराव क्र. ०९ अन्वये मे. अर्बन मास ट्रांन्झिट कंपनी यांचे कडून २५० बसेस करीता डी.पी.आर. (Detail Project Report) बनवून केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला. सदर डी.पी.आर. ला अनुसरुन केंद्रशासनाकडून मिरा भाईंदर

महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी पहिल्या टप्प्यात ५० बसेससाठी ११ कोटी रुपये मंजूर केलेले आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या सद्य स्थितीमध्ये मे. महालक्ष्मी कृपा इंन्फ्रा. प्रा. लि. यांचे मार्फत भाडे तत्वावर चालू असणाऱ्या सर्व बसेस शासकीय नियमानूसार घसारा मूल्य वजा करून संबधित ठेकेदाराने हस्तातरण करून घ्यावयाच्या आहेत हयाची सर्व रक्कम (१००%) ठेकेदाराने अदा करावयाची आहे.

केंद्र शासनाच्या JNNURM योजने अंतर्गत ५० टक्के रक्कम महानगरपालिका, ३५ टक्के रक्कम केंद्र शासन व १५ टक्के रक्कम राज्य शासन या प्रमाणात निधी उपलब्ध होणार आहे. ५० बसेस खरेदी करण्यासाठी प्रकल्प अहवालानुसार (LED, Multiplex Wiring, GPS वगळून) किंमत रु. ९,८८,७८,८००/- (अक्षरी नऊ कोटी अठ्ठयाऐंशी लाख अठ्ठयाहत्तर हजार आठशे मात्र) एवढा खर्च येणार आहे. JNNURM च्या नियमावलीनुसार ५० टक्के रक्कम म्हणजेच रु. ४,९४,३९,४००/- (अक्षरी चार कोटी चौऱ्यान्नव लाख एकोणचाळीस हजार चारशे मात्र) एवढी रक्कम महानगरपालिकेला स्वतः गुंतवणूक करणे आवश्यक आहे व उर्वरीत रक्कम रु. ४,९४,३९,४००/- शासनाकडून अनुदान स्वरुपात प्राप्त होणार आहे.

M.B.M.T. ने केंद्र शासनाला सादर केलेल्या D.P.R. नुसार उर्वरित १५० बसेस मंजूर झाल्यानंतर या साठी केंद्र शासनाकडून अनुदान (५०%) उपलब्ध करून दिले नाही तर संपूर्ण १००% खर्च हा ठेकेदारास करावा लागणार आहे, जर केंद्र शासनाने अनुदान उपलब्ध करून दिले तर त्या प्रमाणात रॉयल्टी सुद्दा ठेकेदाराने वाढवून देणे क्रमप्राप्त आहे.

अ. क्र.	तपशिल	शासनाकडून उपलब्ध होणारे अनुदान	ठेकेदाराकडून P.P.P. माध्यमातून उपलब्ध होणारी रक्कम
१	सद्य. स्थितीत M.B.M.T. च्या चालू असणाऱ्या बसेस हस्तातरण करणे.	-	१००%
२	JNNURM अंतर्गत ५० बसेस	५०%	५०%
३	भविष्यात D.P.R. नूसार उर्वरित १५० बसेस खरेदी बाबत.	५०%	५०%
४	भविष्यात ५० टक्के अनुदान उपलब्ध झाले नाही तर D.P.R. नूसार उर्वरित १५० बसेस खरेदी बाबत.	-	१००%

सद्यस्थितीमध्ये महानगरपालिकेचा परिवहन उपक्रम चालविण्यासाठी महानगरपालिका अनुदान उपलब्ध करुन देत आहे व एकदा एवढी मोठी रक्कम परिवहन उपक्रमासाठी गुंतवणूक करणे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता शक्य नाही. यासाठी महानगरपालिकेने केंद्र शासनाच्या

JNNURM योजने अंतर्गत येणाऱ्या बसेस मार्गस्थ करण्याच्या बाबत मा. महासभा दि. ११/०२/२०१०, ठराव क्र. ५१ नुसार पी.पी.पी. (सार्वजनिक खाजगी सहभाग) या तत्वावर चालविण्यासाठी मंजुरी देण्यात आली.

मा. महासभेच्या धोरणात्मक निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने पी.पी.पी. च्या माध्यमातून बसेस मार्गस्थ करणे या करीता दै. महाराष्ट्र टाईम्स व हिंदुस्थान टाईम्स या दोन वृत्तपत्रामधून दि. ०४/०६/२०१० रोजी निविदा प्रसिद्ध केली होती. हा निविदा कालावधी दि. ०५/०६/२०१० ते २२/०६/२०१० पर्यंत दु. १.०० वाजेपर्यंत होता व निविदा भरणेपूर्वीची बैठक दि. २२/०६/२०१० रोजी संध्या. ४.३० वाजता होती.

निविदा घेण्याच्या मुदतीत खालील नमूद केलेल्या ठेकेदारांनी E-Tendering द्वारे निविदा फॉर्मची रक्कम भरुन निविदा उपलब्ध करुन घेतल्या.

१) मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर

२) मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर

३) मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर

दि. २२/०६/२०१० रोजी संध्या. ६.३० वाजता निविदा धारकाची बैठक मा. आयुक्त सो., यांचे अध्यक्षतेसाठी आयुक्त कार्यालयात झाली. त्यामध्ये निविदाकारांनी लेखी व तोंडी स्वरुपात निविदेतील अटी-शर्ती व अन्य अडचणी बाबत चर्चा केली. याबाबत सविस्तर चर्चा करुन मा. आयुक्त सो., यांनी अंतिम निर्णय दिले. निविदा भरणेपूर्वीची बैठकीतील मुद्दे हा निविदेचा भाग असल्यामुळे याबाबत सर्व निविदा धारकास E-mail द्वारे व लेखी स्वरुपात पत्राने मा. आयुक्त – मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा निर्णय कळविण्यात आला. या निविदा पूर्व बैठकीसाठी खालील ठेकेदार उपस्थित होते.

१) मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर

२) मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर

३) मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर

दि. २९/०६/२०१० रोजी निविदा स्विकारणेची अंतिम तारीख होती, परंतु या निविदा धारकांना बँकेकडून EMD भरतांना अडचणी निर्माण झाल्यामुळे यापैकी एक निविदाकार मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांनी निविदा स्विकारण्याची मुदत एक दिवसाने वाढवावी अशी लेखी विनंती केली, त्याप्रमाणे मुदत एक दिवस वाढवून दि. ३०/०६/२०१०, संध्या. ३.०० वा पर्यंत वाढविण्यात आली.

दि. ३०/०६/२०१०, संध्या. ५.३० वा. सर्व निविदा धारक व मा. उपायुक्त तथा परिवहन व्यवस्थापक, मुख्यलेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक व सहा. आयुक्त (परिवहन) यांचे समक्ष

E-Tendering द्वारे प्राप्त निविदा उघडण्यात आल्या. तांत्रीक बाबी संबधी सर्व मुद्यांची छाननी मा. उपायुक्त सो., मुख्य लेखाधिकारी सो., मा. मुख्य लेखापरिक्षक व सहा. आयुक्त यांनी करुन घेतली असता तीनही निविदा धारक १) मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर २) मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर ३) मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर यांची सर्व कागदपत्रे योग्य असल्याचे दिसून आले. मा. छाननी समितीची सर्वांच्या शिफारशीनुसार दुसऱ्या देकार बाबतचे लिफाफा उघडण्यात आला असता त्यामध्ये खालीलप्रमाणे देकार आला.

अ.क्र.	निविदा धारकाचे नाव	रॉयल्टी प्रती कि.मी.
१.	मे. कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि., उल्हासनगर	०.९० (अक्षरी नव्वद पैसे मात्र)
२.	**मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर**	**१.०० (अक्षरी एक रुपये मात्र)**
३.	मे. इगल कन्स्ट्रक्शन कंपनी, उल्हासनगर	०.६५ (अक्षरी पासष्ट पैसे मात्र)

निविदा धारकांपैकी मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर यांचा देकार हा सर्वात जास्त म्हणजे रु. १.०० प्रती कि.मी. इतका आला. मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांचे दर, रॉयल्टी प्रती कि.मी. वाढवून घेण्यासाठी दि. ०३/०७/२०१० च्या पत्रांन्वये पुनश्च वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले, परंतु मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., यांनी प्रती कि.मी. १ रुपये एवढी रॉयल्टीपेक्षा जास्त देकार देता येणार नाही असे लेखी कळविले.

परिवहन उपक्रमाद्वारे पी.पी.पी. (सार्वजनिक खाजगी सहभाग) बसेस मार्गस्थ प्रस्ताव तपासणी, वाटाघाटी व अंतिमीकरण करुन देणे यासाठी केंद्र शासनाच्या C.I.R.T. (Central Institute of Road Transport), पुणे यांच्याकडे संपूर्ण कागदपत्रासह पाठविण्यात आला. या संस्थेचा संपूर्ण प्रस्तावावर अभिप्राय दि. १२/०७/२०१० रोजी महानगरपालिका उपक्रमास प्राप्त झाला. C.I.R.T. यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार सर्वात जास्त देकार देणाऱ्या ठेकेदाराची निविदा स्विकारण्यास हरकत नाही असे नमूद केलेले आहे.

C.I.R.T. यांचे अभिप्रायानुसार मे. केस्ट्रेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., उल्हासनगर यांचा सर्वात जास्त रॉयल्टी प्रती कि.मी. एक रुपया हा सद्य स्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील चालू असलेल्या ५० बसेस, JNNURM योजने अंतर्गत ५० बसेस व भविष्यातील M.B.M.T. च्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या बसेससाठी मान्य करण्यास ही स्थायी समिती ठरावात खालील नमूद बाबीचा अंतर्भाव करून मंजूरी देत आहे.

१) निविदा संचा मध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

२) M.B.M.T. च्या बसेस मध्ये महिलासाठी ६ सीट, जेष्ठ नागरीक २ सीट व शाररीक दृष्टया अपंग व्यक्तीसाठी ३ सीट राखीव ठेवणे बंधनकारक राहील.

३) करारनामा झाल्यानंतर त्याची प्रत स्थायी समिती समोर सादर करावी.

४) शहर वाहतूक तिकीट दरामध्ये वाढ करावयाची असल्यास परिवहन समिती / स्थायी समिती / महासभा यांची परवानगीसह इतर शासकीय नियमानुसार परवानगी घेणे आवश्यक राहील.

५) LED, GPS, Smart Card, system / Ticket Vending Machine (TVM) व इतर सर्व आधुनिक गोष्टीचा समावेश करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

६) M.B.M.T. ची सेवा शहरातील व शहराबाहेरील सर्व मार्गावर चालेल यांची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

७) प्रत्येक रुट वरील बसेस साठीच्या फेऱ्या ठरविण्यात येतील. प्रति बस दैनदिन १८० कि.मी. किंवा प्रत्यक्षात प्रती दिन कि.मी. यापैकी जे जास्त असेल ते ठेकेदाराकडून Royalty घेताना विचारात घेतले जाईल.

८) Bank Guarantee विहीत नमुन्यात व मुदतीत M.B.M.T. कडे सादर करणे बंधनकारक राहील.

९) वाहक / चालक विमा / प्रवासी विमा काढणे /थर्ड पार्टी विमा सुरक्षा व प्रत्येक वर्षी नुतनीकरण करणे याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१०) जिवीत हानी, वित्त हानी, कामगाराचे वेतन कायदे व कामगारांच्या संबधीत सर्व कायदे, अधिनियम यांचे पालन करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

११) बस निवारे यांची बांधणी महानगरपालिका हद्दीत स्टीलचे तयार करुन त्यावर निविदा कालावधी पर्यंत जाहिरातीचे हक्क देण्यात येत आहेत व निविदा कालावधीत बांधणी केलेले स्टिलचे बस निवारे यांची स्वच्छता व दुरुस्ती वेळोवेळी करणे हे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

सुचक :- जुबेर अ. इनामदार

अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती,
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १३/८/२०१०

प्रकरण क्रमांक (४४) :- राई येथे रामंदिर उदयानाची दुरुस्ती करणेबाबत.

ठराव क्रमांक (३९) :-

भाईंदर (प.) राई येथे राममंदिर उदयानाची कंपाउंड वॉल व याच ठिकाणी खचून शेतीमध्ये पडलेली आहे. तसेच आतील व बाहेरील ग्रिल पूर्णपणे गंजलेले आहे सदर उदयानाच्या पायवाटा पूर्णपणे खराब झालेल्या आहेत. सदर काम करण्यासाठी **रु. १४,६५,५००/-** एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर उदयानातील तलावामध्ये गणपती विसर्जन केले जाते. सदर उदयानाची स्थानिक रहिवाश्यांना मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने सदर काम करणे अत्यावश्यक आहे. प्रभाग निधी समितीचा निधी वापरुन उर्वरीत निधी मनपामार्फत करण्यात यावा.

सदर काम करणे अत्यावश्यक असल्याने सदर कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. अनिल सावंत

अनुमोदन :- श्री. प्रविण पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १३/८/२०१०

प्रकरण क्र. (४५) :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आरक्षण क्र.१९२/१९३ येथील हॉस्पीटल इमारतीमधील शवागृहातील शवपेटया वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणेबाबत विचारविनिमय करणे.

ठराव क्रमांक (४७) :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात आरक्षण क्र.१९२/१९३ येथे हॉस्पीटल इमारतीत बांधण्यात आलेली आहे. सदर शवागृहात सन २००६-०७ या वर्षात १६ शवपेटया बसविण्यात आलेल्या आहेत. तद्नंतर आजमितीस एकदाही सदर शवपेटया देखभाल दुरुस्ती करण्यात आलेल्या नाहीत. सध्यास्थितीत सदरचे शवागृह सुरु करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर शवपेटयांची वेळोवेळी देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर कामी रु.६,०००/- प्रति पेटी प्रति महिना Monthly Servicing & four Visit Per month for complete check up & Replacement of damage Parts करीता खर्च येणार आहे.

Sr.No.	Item	Rate/Item
1	Compressor	20,000/-
2	Condenser side fan Motor	2,800/-
3	Evaporator side fan motor	6,150/-
4	Electronic Control & Temp. Meter	3,400/-
5	Capacitor For Running	540/-
6	Capacitor for Starting	490/-
7	Starting Relay	615/-
8	Condenser	4615/-
9	Evaporator	13,850/-
10	Gas Charging Per 4 body unit	3,850/-

वरील प्रमाणे मासिक रु.६,०००/-प्रति युनिट खर्च अपेक्षित असून एकूण मासिक रु.२४,०००/- खर्च अपेक्षित आहे. तरी येणाऱ्या खर्चास व तीन वर्ष मुदतीकरीता निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. जुबेर इनामदार

अनुमोदन :- श्री. बर्नड डिमेलो

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. १३/०८/२०१०

प्रकरण क्र. ४६ :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत लॉजीग, बोर्डींगवर कारवाईकरणेबाबत.

(सदरचा विषय मा. सभापतींच्या आदेशाने तहकुब करण्यात आला.)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. १३/०८/२०१०

प्रकरण क्र. ४७ :- मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील काशिमिरा येथे लावण्यात आलेल्या गॅन्ट्रीबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

(सदरचा विषय मा. सभापतींच्या आदेशाने पुढच्या सभेमध्ये घेण्याचे ठरले.)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १३/०८/२०१०

प्रकरण क्रमांक (४८) :- मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील गटारे / नाले वरील स्लॅबमध्ये फायबर झाकणे बसविणे कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत.

ठराव क्रमांक (४९)

वरील विषयानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील गटारे / नाले यावर असलेल्या स्लॅबमध्ये क्राँक्रीट व लोखंडी जाळया मोठयाप्रमाणावर चोरी होत आहेत. सदर गटारे / नाले वरील झाकणे नसल्याने मोठया प्रमाणावर अपघात होत आहेत. याबाबत नागरीक, लोकप्रतिनिधी, नगरसेवक, यांच्याकडून नियमित तक्रारी प्राप्त होत आहेत. सदर गटारावर क्रॉक्रीट व लोखंडी जाळया ऐवजी फायबर झाकणे बसविणे बाबत वारंवार चर्चा झालेली आहे. सन २०१०-११ या वर्षाच्या अर्थसंकल्पात **"गटारे दुरुस्ती / झाकणे बसविणे"** या लेखाशिर्ष अंतर्गत तरतूद उपलब्ध आहे. सदर कॉंक्रीट / फायबर झाकणे बसविणे कामी वार्षिक दर मागविणे तसेच रू. ५०.०० लक्ष पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- निर्मला सावळे

अनुमोदन :- श्री. हेमन गोविंद

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती दि. १३/०८/२०१०

प्रकरण क्रमांक (४९) मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सर्वधर्मीय उत्सवांतर्गत विविध व्यवस्था करणे कामी खर्चास व वार्षिक मुदतीची निविदा मागविण्यास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे बाबत.

ठराव क्रमांक (४२)

वरील विषयानुसार महानगरपालिका क्षेत्रात एकूण लोकसंख्या सुमारे ८ लक्ष एवढी असून शहरात सर्वधर्मीय नागरीक एकत्रितपणे राहत आहेत. सदर विविध धर्मीय नागरीकांमार्फत विविध सण एकत्रितपणे मोठया उत्सवाने साजरे केले जातात. सदर सणांमध्ये प्रामुख्याने श्री. गणेशोत्सव, गुजराथी समाजाचा नवरात्र उत्सव, मुस्लीम समाजाचा ईद, राजस्थानी समाजाचा गणगौर, जैन समाजाचा कार्तिक पौर्णिमा, उत्तर भारतीयांचा छटपूजा, ख्रिश्चन समाजाचा वेलंकनी उत्सव इत्यादी सण साजरे केले जातात. वरील नमुद सणांना / उत्सवांना खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

अ.क्र.	सणाचे / उत्सवाचे नाव	अंदाजित खर्च
१	गणेशोत्सव	४० लक्ष
२	रमजान ईद	१.४० लक्ष
३	छटपूजा	३ लक्ष
४	कार्तिक पौर्णिमा	२.८५ लक्ष
५	बकरी ईद	१.४० लक्ष
६	गणगौर	०.९२ लक्ष

तरी वरील प्रमाणे विविध उत्सवांकरीता तलाव/चौपाटी येथे लाईटस, हॅलोजन लाकडी रेलिंग, उंच स्टेज, मंडप, गेट, जनरेटर, टेबल, खूर्च्या, स्पीकरसेट, बोटी, लाकडी तराफे, निर्माल कलश इत्यादी व्यवस्था करावी लागते.

सदर कामी सन २०१० -११ च्या वर्षात अर्थसंकल्पामध्ये "सर्वधर्मिय मंडप/लाईट/इतर व्यवस्था" या लेखाशिर्षकामध्ये सदर कामी रू. ५०.०० लक्ष तरतूद उपलब्ध आहे. तरी सदर खर्चास व वार्षिक मुदतीच्या निविदा मागविण्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :-
श्री. बर्नड डिमेलो

अनुमोदन :-
गुरुदास चलिगाई

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

10-11/DKV/DK/ T 14

मिरा-भाईदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १३/८/२०१०

प्रकरण क्रमांक (५०) :- भाईंदर (प.) टेंभा हॉस्पीटल करीता Hospital Consultant नेमणेस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

ठराव क्रमांक (४३) :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (प.) टेंभा येथे हॉस्पीटल इमारत बांधणेचे काम प्रगतीपथावर आहे. सदर कामी मे. आर्किझम यांची PMC म्हणून यापूर्वीच नियुक्ती करण्यांत आलेली आहे. मे. आर्किझम यांचेमार्फत हॉस्पीटल इमारतीचे प्लॅनिंग व डिझाइन बाबतची कार्यवाही करण्यांत आली आहे. परंतु हॉस्पीटल अंतर्गत फर्निचर लेआउट व त्यासंबधी कामे, हॉस्पीटल करीता लागणारी मशीनरीचे Specification तयार करुन काम पुर्ण करुन घेणे व हॉस्पीटल कर्मचारी प्रशिक्षित करणे कामी अनुभवी अशा Hospital Consultant ची नेमणूक करणे गरजेचे आहे. तरी वरील कामी Hospital Consultant नेमण्यासाठी निविदा मागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. याकुब कुरेशी

अनुमोदन :- श्रीम. अनिता पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती दि. १३/०८/२०१०

प्रकरण क्रमांक (५१) निविदास मान्यता देणे.

ठराव क्रमांक (७४)

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित रक्कम			
१)	मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) हॉस्पिटल ब्लड बँक करीता वातानूकूलित यंत्रणा बसविणे.	रु. १२,४९,९५०/-			
	Description	**Qty**	**Per / Unit**	**Rate**	**Total**
1	Supplying Installation of 2 Ton AC	21	NO		
	1) M/s. Utiltity Enterprises	**21**	**NO**	**40,000/-**	**8,40,000/-**
	2) M/s. Lalit Enterprises	21	NO	40,800/-	8,56,800/-
	3) M/s. Lalit Construction	21	NO	40,650/-	8,53,650/-
2	Providing and Fixing Copper Piping and Installation	672	RFT		
	1) M/s. Utiltity Enterprises	**672**	**RFT**	**610/-**	**4,09,920/-**
	2) M/s. Lalit Enterprises	672	RFT	640/-	4,30,080/-
	3) M/s. Lalit Construction	672	RFT	680/-	4,56,960/-

वरील तुलनात्मक तक्ता पहाता ठेकेदारांनी सादर केलेली सर्वात कमी दराची निविदा ही वाजवी आहे.

मे. युटीलिटी इंटरप्रायजेस यांची कमी दराची निविदा मंजूर करण्यात येत आहे.

सुचक :- श्री. अनिल सावंत

अनुमोदन :- श्रीमती अनिता पाटील

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १३/०८/२०१०

प्रकरण क्र. ५२:- मा. आयुक्त सो. यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे.

ठराव क्र. ४५

(उद्यान विभाग)

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजीत रक्कम
१.	घनकचरा प्रकल्प उत्तन व विविध उद्यानात सुंगधी वनस्पती व इतर फळझाडे पुरवठा करणेकामी मे. सागर इंटरप्रायजेस व व्होरा इंटरप्रायजेस यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे.	रु. ४,३७,१५०/-
२.	सरस्वतीनगर आरक्षण क्र. १०९ उद्यानात खेळणी व बेचेंस बसविणेकामी. मे. एम.एस.एस.आय.डी.सी. यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे.	रु. ९,९१,५००/-
३.	मिरारोड आरक्षण क्र. १७० येथे खेळाचे मैदान लेव्हलिंग, रोलिंगव सपाटीकरण करणेकामी. मे. एम.एस.एस.आय.डी.सी. यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे	रु. १,१३,६२२/
४.	सावित्रीबाई फुले उद्यानात खेळणी पुरवठा करुन बसविणेकामी. मे. एम.एस.एस.आय.डी.सी. यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे.	रु. ६,०२,६००/-
५.	सरस्वतीनगर आरक्षण क्र. १०९ उद्यानात मल्टी प्ले सिस्टम खेळणी बसविणेकामी. मे. एम.एस.एस.आय.डी.सी. यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे.	रु. ९,९०,०००/
६.	मुर्धा बाल उद्यानात खेळणी पुरवठा करुन बसविणेकामी. मे. एम.एस.एस.आय.डी.सी. यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे.	रु. ७,८८,२००/-
७.	सावित्रीबाई फुले उद्यान काशिमिरा येथे लॅन्ड स्केपींग करुन सुशोभिकरण करणेकामी मे. एम.एस.एस.आय.डी.सी. यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे.	रु. ५,७५,७५०/-
८.	सरस्वतीनगर येथील उद्यानात लॅन्डस्केपींग करुन सुशोभिकरण करणेकामी मे. रेफ्युजी हरिजन मजुर कामगार सोसायटी यांना कार्यादेश देण्यात आला आहे.	रु. ९,९९,७९०/

वरील सर्व कामांना मा. आयुक्त सो., यांनी मंजुरी दिलेली आहे. सदर काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार अवलोकनार्थ सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाचे मा. स्थायी समितीने अवलोकन केले आहे.

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. १३/०८/२०१०

प्रकरण क्र. :- (५३) मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या कामाचे अवलोकन करणे.

ठराव क्रमांक :- (४६)

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या खालील कामांना मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे.

अ.क्र	कामाचे नांव	अंदाजित खर्च	ठेकेदाराचे नांव	मजूर दर
	भाईंदर (प) टेवा रोड वरील काशिरी ज्योत ते सदासमृती अपार्ट, पर्यंतच्या गटारावरील स्लॅब दुरूस्ती करून पेव्हर ब्लॉक बसविणे.	रू. ४,४८,७००/	मे. साईश्रध्दा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. मुरबाड, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर
२	भाईंदर (प) विनायक नगर समाज मंदिर व टेक्सा हॉस्पिटल येथे पार्टीशन टाकून प्रयोगशाळा तयार करणे.	रू. १,२२,८००/	मे. साईश्रध्दा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. मुरबाड, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर
३	भाईंदर (प) प्रभाग क्र. ३६ येथे एकविरा अपार्ट. ते शिवकृपा अपार्ट पर्यंत गटार तयार करून स्लॅब टाकणे.	रू. ५,४०,४००/	मे. बावधर मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर
४	भाईंदर (प) प्रभाग क्र. ३९ येथे गॅलेक्सी अपार्ट व पल्लवी अपार्ट येथे पेव्हर ब्लॉक बसविणे.	रू. ४,५७,८००/	मे. साईश्रध्दा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. मुरबाड, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर
५	भाईंदर (प) प्रभाग क्र. ३९ येथे जैन अपार्ट ते शितलकुंज अपार्ट. स्लॅब दुरूस्ती करून कोटा लादी बसविणे.	रू. ३,५०,०००/	मे. सरीता मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर
६	मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक वापराच्या विहिरी उपसून गाळ काढणे.	रू. ९,९२,९००/-	मे. शितलादेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या ता. शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर
७	भाईंदर (प) प्रभाग क्र. १ येथे जय अंबे १ व २ ला जोडणाऱ्या गटाराची उंची वाढवून संरक्षक भिंत बांधणे.	रू. ४,०२,२००/	मे. शितलादेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर

८	भाईंदर (प) शिव महिमा अपार्टच्या मागील नाल्यावर नाला दुरूस्ती करून स्लॅब टाकणे.	रू. १,७५,१००/	मे. रिफ्युजी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर , जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय [illegible]
९	भाईंदर पश्चिम गुर्धा येथे स्मशानभुमि व दफनभूमि मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व कलरकाम करणे.	रू. ३,९५,३००/-	मे. माहुली आदि. हमाल मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय [illegible]
१०	मुर्धा येथे भागेश्री बंगला ते भालचंद्र भोईर यांच्या घरापर्यंत गटार दुरूस्ती करून स्लॅब टाकणे.	रू. ३,२४,१००/	मे. माहुली आदि. हमाल मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय [illegible]
११	मुर्धा येथे राम मंदिर समोरील परिसरात रस्ते दुरूस्ती करणे.	रू. ५,२८,२००/	मे. प्रगती आदि. मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय [illegible]
१२	मुर्धा येथे गांवदेवी तलाव ते राम मंदिरा पर्यंतच्या गटारावर लोखंडी झाकणे बसविणे.	रू. ३,७३,४००/	मे. कल्याणी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय [illegible]
१३	भाईंदर (प) मुर्धा येथे बालोद्यान मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व कलर काम करणे.	रू. ७,२३,३००/-	मे. कल्याणी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय [illegible]
१४	भाईंदर (पूर्व) गोडदेव येथील गांवदेवी मंदिर ते मच्छी मार्केट पर्यंत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे.	रू. ९,७७,९००/-	मे. सुयोग मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय [illegible]
१५	राई गावातील राई नल्लाली गल्लीचे पॅचवर्क करणे.	रू. ४९,०००/	मे. श्रीगणेश इंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय [illegible]
१६	राई गावातील डबका आळी गल्लीचे पॅचवर्क करणे.	रू. ४९,०००/	मे. श्रीगणेश इंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय [illegible]
१७	भाईंदर (प) विनित अपार्ट, समोरील गटार दुरूस्ती करणे.	रू. ४९,२००/	मे. राजेश्री इंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय [illegible]
१८	उत्तन येथे मच्छी मार्केट समोरील गल्लीतील पेव्हर ब्लॉक दुरूस्ती करून बसविणे.	रू. ४९,०००/-	मे. श्रीगणेश इंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय [illegible]
१९	भाईंदर (पूर्व) नवघर शाळा क्र. १३ मध्ये अत्यावश्यक कामे करणे.	रू. ९,९८,८००/-	मे. श्रीशंभोमहादेव मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय [illegible]

२०	भाईंदर (प) दत्त मंदिर कुंगार्डी येथे दत्त मंदिराच्या बाजूचे गटार तयार करणे.	रु. २,३८,२००/-	मे. साईश्रध्दा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. मुरबाड. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर
२१	मिरारोड वॉर्ड क्र. ५७ मधील स्टर्लिंग टॉवर ते सरुपी, जमुना सरस्वती, दाऊद मंजिल पर्यंत गटारावर स्लॅब टाकणे.	रु.९,९७,१५०/	मे. श्रीवज्रेश्वरी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. पालघर , जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर
२२	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अंगणवाडी / शाळा येथील विद्युत कामे देखभाल व दुरुस्ती करणे.	रु.३,९९,९७६/-	मे. शेखर इलेक्ट्रीकल्स	
२३	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी विभागातील स्ट्रीट लाईट पोल देखभाल व दुरुस्ती करणे.	रु.८,७६,८१९/-	मे. शेखर इलेक्ट्रीकल्स	
२४	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य कार्यालय / प्रभाग कार्यालय येथील विद्युत कामे देखभाल व दुरुस्ती करणे.	रु.५,९९,८३३/-	मे. शेखर इलेक्ट्रीकल्स	
२५	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने / तलाव येथील विद्युत कामे देखभाल व दुरुस्ती करणे.	रु.६,९९,९८९/	मे. शेखर इलेक्ट्रीकल्स	
२६	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमी / दफनभूमी येथील विद्युत कामे देखभाल व दुरुस्ती करणे.	रु.५,००,०००/	मे. शेखर इलेक्ट्रीकल्स	
२७	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्यानातील मोटारपंम्प व प्लम्बिंग कामे देखभाल व दुरुस्ती करणे.	रु.४,९४,६३१/	मे. शेखर इलेक्ट्रीकल्स	
२८	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फाउंटन देखभाल व दुरुस्ती करणे.	रु.१,१०,०००/	मे. शेखर इलेक्ट्रीकल्स	कोटेशन दर
२९	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्य कार्यालय इमारती मधील मा. स्थायी समिती व मा. महासभा सभागृहातील माईक सिस्टीम देखभाल दुरुस्ती करणे.	रु.४,४९,८००/	मे. शेखर इलेक्ट्रीकल्स	कोटेशन दर
३०	मिरारोड शांतिनगर से. ८ मधील उद्यानामध्ये नामफलक बसविणे.	रु. ४९,८००/	मे. एस.एम. कंस्ट्रक्शन	अंदाजपत्रकिय दर
३१	छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील प्लेझंट पार्क येथे ब्लींकर बसविणे.	रु. १,६३,३५०/-	मे. माहुली आदि. हमाल मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर
३२	मिरारोड सुभद्रापार्क येथे व प्रिमियर टॉवर पर्यंत गटारावर स्लॅब टाकणे व सी.सी. रस्ता करणे.	रु. ७,६३,३००/	मे. साईज्योत मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर

३३	मिरारोड वॉर्ड क्र. ५३ मधील कुणाल शॉपिंग सेंटर ते वासी को.ऑप. सोसायटी पर्यंत गटारावर स्लॅब टाकणे.	रू. १०,००,०००/	मे. साईस्मित मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दरा
३४	मिरारोड निदा पार्क ते बनेगर स्कूल पर्यंत फुटपाथवर पेव्हरब्लॉक बसविणे.	रू. ५,११,३५०/	मे. विजय मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दरान
३५	मिरारोड निदापार्क ते बनेगर स्कूल पर्यंत रस्ता बी.एम. सिलकोट ने डांबरीकरण करणे.	रू. १०,००,०००/	मे. साईस्मित मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
३६	भाईंदर (प) मिरा-भाईंदर मुख्य कार्यालयात वैद्यकीय आरोग्य विभागामध्ये पार्टीशन कामे, टेबल व इतर दुरूस्ती कामे करणे.	रू. ४,०७,८००/	मे. आशा मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर, जि ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
३७	मिरारोड परिसरात गतिरोधक बसविणे व पट्टे मारणे.	रू. १०,००,०००/	मे. विजय मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
३८	भाईंदर (पूर्व) बाल उद्यानासाठी लोखंडी रेलिंग बसविणे व इतर कामे करणे.	रू. ९,९९,८००/	मे. चिंतामणी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. भिवंडी, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर
३९	भाईंदर (पूर्व) गोडदेव मच्छी मार्केट रामोरून विमल डेरी रस्त्यापर्यंत दुरूस्ती करून पेव्हर ब्लॉक बसविणे.	रू. ६,३६,४००/-	मे. मणनाथ मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर
४०	भाईंदर (प) देवसृष्टी टॉवरच्या मागील गटार तयार करणे.	रू. ३,६१,२००/	मे. गुरूकृपा बिल्डींग व रोड बांधकाम मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. भिवंडी, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
४१	भाईंदर (प) प्रभाग क्र. २० येथे स्टेशन रस्त्यावरील महावीर अपार्ट. ते शांतीसागर अपार्ट, पर्यंत फुटपाथ दुरूस्ती करणे.	रू. ४,२८,६००/	मे. रामकृष्ण मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. भिवंडी, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर
४२	भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. ४८ मधील रावलनगर येथे शांती निवास ए रामोर व रावलनगर डी रामोर येथे रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी)	रू. १,२८,०००/-	मे. श्रीगजानन मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर
४३	घोडबंदर नवघर येथील उघाडीचे तुटलेले दरवाजे नविन बसविणे.	रू. २,२५,५००/-	मे. श्रीगजानन मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर

४४	गाईदर (पूर्व) आकाश क्लासिक रामोर सी.सी. क्रॉस ड्रेन बांधणे.	रू. ४,१५,२००/-	मे. मणनाथ मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दरा
४५	काशिगांव येथील पुजापार्क इमारती जवळ आर.सी.सी. स्लॅब ड्रेन बांधणे.	रू. ९,९०,५००/-	मे. ओम मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर , जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
४६	हटकेश उदयोग नगर येथील पॉश कॉम्पलेक्सकडे जाणारा रस्ता उंची वाढवून डांबरीकरण करणे. (नगरसेवक निधी)	रू. ९,९८,८००/-	मे. गोपालकृष्ण मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. भिवंडी, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
४७	मिरारोड गुजराथी शाळा क्र. २१ साठी रंगरंगोटी व दुरूस्तीची कामे करणे.	रू. १,५०,०००/	मे. रिफ्युजी हरिजन मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर , जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
४८	मिरारोड येथील हॉस्पिटल करीता फर्निचरचे काम करणे.	रू. ७,४९,७००/	मे. लुणंगदेव मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर , जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
४९	मिरारोड प्रभाग कार्यालय ४ येथे पहिल्या मजल्यावरील उर्दु शाळेच्या वर्गासाठी विविध काम करणे.	रू. ६,४९,५००/	मे. लुणंगदेव मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर , जि. ठाणे.	अंदाजपत्रकि
५०	मिरारोड प्रभाग कार्यालय ४ पहिल्या मजल्यावरील प्रशिक्षण केंद्रासाठी फर्निचर व विविध कामे करणे.	रू. २,६८,४००/-	मे. रिफ्युजी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर , जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
५१	मुर्धा महानगरपालिका शाळेस कलरकाम करणे व इतर कामे करणे.	रू. ५,००,०००/	मे. प्रगती आदि मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
यापुर्वी महानगरपालिकेने, महापालिकेच्या जागेवर उभारण्याकरीता दिलेल्या १०X२० चौ.फुट या आकारमानाच्या होर्डिग्जकरीता रु.४००१/- प्रतिमहा हा मंजुर निविदा दर लागू आहे. तरी सदरहू मंजुर दर विचारात घेता व नियमातील तरतुदींचा विचार करता सदर (प्रकाशित जाहिरात फलक) हे ३ वर्षाच्या कालावधीकरीता रु.४००१/- प्रतिमहा या दराने व तदनंतर पुढील प्रत्येक वर्षी १० टक्के महसूल रक्कमेत वाढ करणेत यावी. तसेच महानगरपालिकेच्या जाहिरात फलकाच्या मंजुर दरानुसार प्रकाशित असलेल्या फलकाकरीता मासिक फी वरती २० टक्के जादा प्रकाशित फी आकारण्यात यावी. सदरहू करार हा १५ वर्षे मुदतीकरीता करावा. व तद्नंतर कॅन्टीलिव्हर पोल हे महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात यावे.

यापुर्वी मा.स्थायी समिती सभा दि.२९/०२/२००८ ठराव क्र.४३ व मा.महासभा दि.१९/०३/२००८ ठराव क्र.३५ अन्वये मा.आयुक्त सो., यांना नव्याने होर्डिग्जची जागा/जाहिरातीचे नविन स्तोत्र उपलब्ध झाल्यास, त्याबाबत निर्णय घेण्यास प्राधिकृत केलेले आहे.

तरी वरीलप्रमाणे मे.सरस्वती ॲडव्हटायजिंग सर्विस यांनी मागणी केलेल्या प्रस्तांवास मुंबई प्रांतिक महानगपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये प्राप्त अधिकारानुसार, महापालिकेच्या हिताचा विचार करुन, करारनामा करुन परवानगी देण्याचे संपुर्ण अधिकार मा.आयुक्त सो., यांना देण्यात येत आहेत.

उपरोक्त प्रस्तावाला हि मा.स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

सुचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती सभा
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Backup\2010-11\Saraswati Ads..doc

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती दि. ०४/०२/२०११

प्रकरण क्र. १११ :- दि. १६/०६/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र.१०३ :-

दि. १६/०६/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- **अनुमोदन :-**

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती दि.४/२/२०११

प्रकरण ३९२ :- महानगरपालिकेच्या विविध विभागातील वाहनांवर ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणे कामी प्रशासकिय / आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.

ठराव क्र. ५०४:-

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची मालकिची एकुण ७२ वाहने असुन सदर वाहने आवश्यकतेनुसार विविध विभागात उदा.अग्निशमन, पाणी पुरवठा, आरोग्य, रुग्णवाहिका, शववाहिनी, फिरता दवाखाना इ. वाहनांवर स्थायी वाहनचालक यांची संख्या अपुरी असल्याने ठेका पध्दतीने वाहन चालक पुरवठा करणें आवश्यक आहे. अत्यावश्यक सेवेतील वाहने दोन ते तीन पाळीत चालु असतात. सदर वाहनावर महानगरपालिकेकडून आवश्यतेनुसार वार्षिक ठेका पध्दतीने वाहनचालक /ऑपरेटर यांचा पुरवठा करण्यांत येतो.

सन २०१०-११ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकिय तरतुदीत वाहन चालक पुरवठा करणे कामी रु. ५० लाख इतकी तरतुद करण्यांत आलेली आहे.

महानगरपालिकेकडे सध्या उपलग्ध असलेले एकुण ५४ इतके वाहन चालक आहेत. महानगरपालिकेचे वाहन चालक कमी प्रमाणात असल्याने ठेका पध्दतीने गरजेनुसार वेळोवेळी लागणारे वाहन चालक ठेकेदाराकडून उपलब्ध करुन घेतले जातात. वार्षिक ठेकापध्दतीने वाहनचालक गरजेनुसार पुरवठा करणे कामी सन २०१० – ११ या वर्षात निविदा मागवून मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स यांना मा.स्थायी समिती सभा ठराव क्र. ७२ दि.०९/१२/२००९ नुसार कंत्राटी पध्दतीने ठेका देण्यांत आलेला आहे. सदर ठेक्याची मुदत दि.३१/०१/२०११ रोजी संपत आहे. नविन निविदा मागविणेची प्रक्रिया पुर्ण करणेकरीता कालावधी लागणार आहे. नविन निविदा मागविणेची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सदरचे ठेकेदार यांना मुदतवाढ देणेस मान्यता मिळावी. तसेच महानगरपालिकेच्या वाहनांवर अत्यावश्यक सेवा व इतर विभागात आवश्यकतेनुसार कंत्राटी (ठेका) पध्दतीवरील वाहनचालक / ऑपरेटर पुरवठा करणेकामी वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन संबंधिताकडून सिलबंद निविदा मागविणेकामी येणाऱ्या आर्थिक व प्रशासकिय खर्चास हि सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- **अनुमोदन :-**

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यांत आला.

सभापती,
स्थायी समिती सभा
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०२/२०११

प्रकरण क्र, ११३ :- स्थानिक संस्था कर थकबाकी वसुलीबाबत आढावा घेणे.

(स्थानिक संस्था कर थकबाकी वसुलीबाबत आढावा घेण्यात आला.)

सही/-
सभापती
मा. स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. ०४/०२/२०११

प्रकरण क्र, ११४ :- जमा खर्चाचा आढावा घेणे.

(जमा खर्चाचा आढावा घेण्यात आला.)

सही/-
सभापती
मा. स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. विशेष स्थायी समिती सभा दि. ०७/०२/२०११

प्रकरण क्र. ११५ :- मनपा शिक्षण कराच्या (विशेष शिक्षण कर) दरात वाढ करणेस मंजूरी मिळणे बाबत. (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ प्रमाणे)

ठराव क्र. १०५ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ संचालित एकुण ३४ शाळा (विविध माध्यम) असून त्यातुन १०३४३ गोरगरीब विद्यार्थ्यांना मनपातर्फे मोफत शिक्षण दिले जाते. त्याच बरोबर विद्यार्थ्यांना गणवेश, प्रश्नपत्रिका/उत्तरपत्रिका, शालेय क्रिडा स्पर्धा, संगणक प्रशिक्षण, सास्कृतिक व ऐतिहासीक सहल इ. भौतिक सुविधा मोफत उपलब्ध करुन दिल्या जातात.

दरवर्षी दोन जून्या शाळा पाडुन नव्याने (आर.सी.सी.) सिमेंट क्रॉंक्रेटच्या इमारती (शाळा) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधल्या जातात व काही जून्या शाळांची दुरुस्ती केली जाते. त्यासाठी अंदाजे रु. २ कोटी खर्च होतो. शाळेतील सर्व शिक्षकांच्या वेतनाकरीता, सेवा निवृत्ती वेतन, वैद्यकिय प्रतिपुर्ती, उपदान, अंशराशी करण तसेच ६ व्या वेतन आयोगातील वेतनाचा फरकांची रक्कम हा सर्व खर्च अंदाजे रु. ९.४० कोटी एवढा असून शासनाकडुन ५०% अनुदान प्राप्त होत असते, व ५०% खर्च महानगरपालिकेस करावा लागत असून हा खर्च अंदाजे रु. ४.७० कोटी आहे. सन २००९-१० या वर्षात विशेष शिक्षण करामार्फत रु. १ कोटी ७० लाख रुपये उत्पन्नाचा अंदाज अर्थसंकल्पात दाखविण्यांत आला आहे. तसेच इमारत भाडयापोटी शासनाकडुन सन १९९४ ते १९९८ पर्यंत ५०% प्रमाणे रु. ८७,९१,३८०/- प्राप्त झाले आहेत व शासनाकडुन त्यानंतरचे रु. ४,७४,७३,४५२/- शाळा गृह भाडे येणे बाकी आहे. उत्पन्नाचे तुलनेत खर्च फारच अधिक आहे.

मा. महासभा ठराव क्र. ६८ अन्वये ३१/०३/२०१० रोजी विशेष शिक्षण करात १% करवाढ करण्यात आली होती. मा. महासभा ठराव क्र. ६८ दि. ३१/०३/२०१० रोजीचा ठराव शासनाने क्र. मिभामनपा/१११०/५३८/प्रक्र९३/२०१०/नवि-२८ दि. १८/०१/११ अन्वये निलंबीत केला आहे. परिणामी शिक्षण मंडळाच्या अंतर्गत असलेल्या शाळांकरीता करावयाच्या विकास कामांवर त्याचा परिणाम झाला आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेउन विशेष शिक्षण कर १% ऐवजी २% प्रमाणे शिक्षण करामध्ये वाढ केल्यास महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या विकासकामांकरीता निधी उपलब्ध होणार आहे. विशेष शिक्षण कर १% ऐवजी २% केल्यास महानगरपालिकेस अंदाजे एकुण रु. २.८० कोटीचे उत्पन्न मिळु शकेल.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० मधील तरतुदी प्रमाणे महानगरपालिका चालू आर्थिक वर्षामध्ये लावण्याजोग्या कोणत्याही करात अनुपुरक कराधन लादून वाढ करता येईल किंवा तो नव्याने लादता येईल. या तरतुदीच्या अधिन राहुन महानगरपालिकेने या आर्थिक वर्षात शिक्षण कर करयोग्य मूल्याच्या १% वरुन २% करणेस ही सभा मंजूरी देउन मा. महासभेच्या मान्यतेस शिफारस करीत आहे.

सुचक :- श्रीम. कॅटलीन परेरा **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत मोदी**

ठरावाच्या बाजुने	ठरावाच्या विरोधात	तटस्थ
१) श्री. स्टिवन मेन्डोन्सा २) श्रीम. निर्मला सावळे ३) सौ. कॅटलीन परेरा ४) श्री. चंद्रकांत मोदी ५) श्री. चंद्रकांत म्हात्रे ६) श्रीम. सुधा व्यास ७) श्री. शशिकांत भोईर ८) श्रीम. मुसरर्तबानु शेख ९) श्री. मोहन जाधव १०) श्री. दिनेश नलावडे ११) श्री. भगवती शर्मा १२) श्री. लक्ष्मण जंगम	१) सौ. स्नेहा पांडे २) श्री. रामनारायण दुबे	निरंक

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईदर महानगरपालिका

२०४

मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०२/२०११

प्रकरण क्र. ११६:- **मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(बब) नुसार "मलप्रवाह सुविधा लाभ कर" लागू करणेस मंजूरी मिळणे बाबत. (मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम १५० व ९९ प्रमाणे)**

ठराव क्र. १०६:-

मिरा भाईंदर महानगरपालिकेने जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन अंतर्गत रु. १९०० कोटीचे विविध प्रकल्प सादर केलेले आहेत. त्यामध्ये ५०% शासन व उर्वरीत ५०% रक्कम महानगरपालिकेस उभी करावी लागणार आहे. जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन अंतर्गत सामंजस्य करारामध्ये उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याची हमी महानगरपालिकेने दिलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये कलम १२९(बब) नुसार मलप्रवाह सुविधा लाभ कर लागु करण्याची तरतुद आहे. उक्त तरतुदीनुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेने अद्याप "मलप्रवाह सुविधा लाभ" कर लागू केला नसल्याने, हया बाबत लेखा परीक्षक यांनी आक्षेप नोंदविलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत भुयारी गटार योजनेचा रु. ४९१ कोटीचा प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाकरीता महानगरपालिकेने एम.एम.आर.डी.ए. कडुन रु. २२६ कोटीचे कर्ज घेतले आहे व तत्कालीन कालावधीतील महापौर यांनी ॲग्रीमेन्ट केलेले आहे. या प्रकल्पाकरीता एकुण ५०% निधी महानगरपालिकेने उभा करावयाचा आहे. या दृष्टीने भांडवल निर्मिती करणे, कर्जाचे हफ्ते भरणे, प्रकल्प निर्मीतीनंतर देखभाल दुरुस्ती करणे करीता निधीची आवश्यकता लागणार आहे. याकरीता मलप्रवाह सुविधा लाभ कर सर्व मालमत्ता धारकांस लागू करणे आवश्यक आहे. करयोग्य मूल्याच्या ८% प्रमाणे हा कर लागू केल्यास महानगरपालिकेस अंदाजे रु. ११.२० कोटी एवढे वार्षिक उत्पन्न अपेक्षित आहे.

मा. महासभा ठराव क्र. ६८ दि. ३१/०३/२०१० अन्वये "मलप्रवाह सुविधा लाभ कर" हा कर नव्याने प्रस्तावित करण्यात आला होता. तथापी मा. महासभा ठराव क्र. ६८ दि. ३१/०३/२०१० रोजीचा ठराव, शासनाने क्र. मिभामनपा/१११०/५३८/प्रक्र९३/२०१०/नवि-२८ दि. १८/०१/११ अन्वये निलंबीत केला आहे. परिणामी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

तरी वरील सर्व बाबी विचार करता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९(बब) मध्ये "मलप्रवाह सुविधा लाभ कर" लागू आहे. तरी करयोग्य मूल्याच्या ८% प्रमाणे मलप्रवाह सुविधा लाभ कर सर्व मालमत्ता धारकांना आकारणेकामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० मधील तरतुदी प्रमाणे महानगरपालिका चालू आर्थिक वर्षामध्ये लावण्याजोग्या कोणत्याही करात अनुपुरक कराधन लादून वाढ करता येईल किंवा तो नव्याने लादता येईल. या तरतुदीच्या अधिन राहुन महानगरपालिकेने या आर्थिक वर्षात सर्व मालमत्तांना करयोग्य मूल्याच्या ८% प्रमाणे मलप्रवाह सुविधा लाभ कर आकारणेस करणेस ही सभा मंजूरी देउन मा. महासभेच्या मान्यतेस शिफारस करीत आहे.

सुचक :- श्री. लक्ष्मण जंगम **अनुमोदक :- श्री. मोहन जाधव**

ठरावाच्या बाजुने	ठरावाच्या विरोधात	तटस्थ
१) श्री. स्टिवन मेन्डोन्सा	१) सौ. स्नेहा पांडे	निरंक
२) श्रीम. निर्मला सावळे	२) श्री. रामनारायण दुबे	
३) सौ. कॅटलीन परेरा	३) श्रीम. सुधा व्यास	
४) श्री. चंद्रकांत मोदी		
५) श्री. चंद्रकांत म्हात्रे		
६) श्री. शशिकांत भोईर		
७) श्रीम. मुसरर्तबानु शेख		
८) श्री. मोहन जाधव		
९) श्री. दिनेश नलावडे		
१०) श्री. भगवती शर्मा		
११) श्री. लक्ष्मण जंगम		

ठराव बहुमताने मंजूर

Mendonca

सभापती

स्थायी समिती

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०२/२०११

प्रकरण क्र. ११७ :- मालमत्ता कराच्या (घरपट्टी) दरात वाढ करणेस मंजूरी मिळणे बाबत.(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ प्रमाणे)

ठराव क्र. १०७ :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मालमत्ता कर हे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत आहे. मालमत्ता कराचा दर सन २००२-०३ पर्यंत २५% होता, तो २००३-०४ पासून २८% केलेला असून अद्यापपर्यंत तोच दर कायम आहे. सध्या मालमत्ता कराचे २८% प्रमाणे प्रतिवर्षी रक्कम रु. ३७.०० कोटी इतके उत्पन्न मिळत आहे. परंतु जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनीवल मिशन (JNNURM) या प्रकल्पाचा खर्च, त्यासाठी घ्यावी लागणारी कर्जे व त्याच्या परतफेडीसठी लागणारा निधी विचारात घेता हे उत्पन्न अपुरे पडणार आहे. तसेच १ एप्रिल २०१० पासून "जकात कर" बंद करुन "स्थानिक संस्था" कर लागू केल्याने जकाती पासून मिळणारे उत्पन्नांपैकी स्थानिक संस्था कराचे उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त होत नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने विविध प्रकल्पांसाठी कर्ज घेतले असून त्या कर्जाची रक्कम रु. २९३ कोटी आहे. महानगरपालिकेस प्रतिवर्षी कर्ज परतफेड हफ्ता, वेतन भत्ते, पाणी बिल, विज बिल, प्राथमिक आरोग्य केंद्र चालविणे इ. कामी रु. १०० कोटी प्रतीवर्षी खर्च होत आहे. यामुळे निधी उपलब्ध करणेकामी मालमत्ता कराच्या दरात वाढ करणे अत्यावश्यक आहे.

विविध प्रकल्पांना लागणारा निधी, कर्ज परतफेडीसठी लागणारा निधी, जकात बंद झाल्यानंतर उत्पन्नात होणारी घट विचारात घेता मालमत्ता कराच्या दरामध्ये वाढ करणे आवश्यक असल्याने सध्या असलेल्या सध्या मालमत्ता कराच्या दरामध्ये खालीलप्रमाणे मा. महासभा ठराव क्र. ६८ दि. ३१/०३/२०१० अन्वये करवाढ करण्यांत आली होती.

करयोग्य मूल्य	जूने दर	नविन दर
१ ते १२०००	२८%	३०%
१२००१ ते ३००००	२८%	३२%
३०००१ ते ५००००	२८%	३५%
५०००१ पेक्षा जास्त	२८%	३८%

तथापी मा. महासभा ठराव क्र. ६८ दि. ३१/०३/२०१० रोजीचा ठराव शासनाने क्र. मिभामनपा/१११०/५३८/प्रक्र९३/२०१०/नवि-२८ दि. १८/०१/११ अन्वये निलंबीत केला आहे. वरील तक्त्यामध्ये करयोग्य मूल्याच्या टप्याबाबत सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा यांनी दि. १०/०१/२०११ रोजी पत्र देउन सदर दरांत समानता आणावी अशी विनंती केली आहेत. तसेच वरील तक्त्याप्रमाणे केलेली वाढ रद्द करुन सर्व मालमत्तांना ३०% दराप्रमाणे सर्व मालमत्ता धारकांना एक समान प्रमाणे कर आकारणी होईल.

वरील सर्व नमुद केलेल्या बाबींचा विचार करता महानगरपालिकेस प्रतिवर्षी कर्ज परतफेड हफ्ता, वेतन भत्ते, पाणी बिल, विज बिल, प्राथमिक आरोग्य केंद्र चालविणे आदी कामांकरीता निधी आवश्यक आहे. तरी सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून महानगरपालिकेतील सर्व (जून्या व नविन) मालमत्तांना करयोग्य

मूल्याच्या ३०% प्रमाणे वाढ केल्यास महानगरपालिकेस अंदाजे रु. ३ कोटीचे उत्पन्न मिळु शकेल तरी मालमत्ता कराच्या (घरपट्टी) कराच्या दरात वाढ करणे करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० मधील तरतुदी प्रमाणे महानगरपालिका चालू आर्थिक वर्षामध्ये लावण्याजोग्या कोणत्याही करात अनुपुरक कराधन लादून वाढ करता येईल किंवा तो नव्याने लादता येईल. या तरतुदीच्या अधिन राहुन महानगरपालिकेने पुढील आर्थिक वर्षात सर्व मालमत्तांना वरील तक्त्याप्रमाणे केलेली वाढ रद्द करुन करयोग्य मूल्याच्या ३०% प्रमाणे घरपट्टी कर आकारणेस ही सभा मंजूरी देउन मा. महासभेच्या मान्यतेस शिफारस करीत आहे.

सुचक :- श्री. भगवती शर्मा **अनुमोदक :- श्री. चंद्रकांत म्हात्रे**

ठरावाच्या बाजुने	ठरावाच्या विरोधात	तटस्थ
१) श्री. स्टिवन मेन्डोन्सा २) श्रीम. निर्मला सावळे ३) सौ. कॅटलीन परेरा ४) श्री. चंद्रकांत मोदी ५) श्री. चंद्रकांत म्हात्रे ६) श्री. शशिकांत भोईर ७) श्रीम. मुसरर्तबानु शेख ८) श्री. मोहन जाधव ९) श्री. दिनेश नलावडे १०) श्री. भगवती शर्मा ११) श्री. लक्ष्मण जंगम	१) सौ. स्नेहा पांडे २) श्री. रामनारायण दुबे ३) श्रीम. सुधा व्यास	निरंक

ठराव बहुमताने मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईदर महानगरपालिका
मा. विषेश स्थायी समिती सभा दि. ०७/०२/२०११

प्रकरण क्र. ११८

ठराव क्र. (१०८)

विषय :- अग्निशमन दलाकडून आलेल्या महसुलीच्या प्रस्तावास मान्यता मिळणे.

अग्निशमन दलाने सादर केलेल्या महसूल वाढीच्या प्रस्तावास, हि मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

सुचक (श्री. प्रजापती शर्मा)

अनुमोदक (श्री. चंद्रकांत मोदी)

सभापती
ठराव सर्वानुमते मंजूर

मिरा-भाईंदर महानगरपालिका

पाणी पुरवठा विभाग

मा. स्थायी समिती सभा दि.०७/०२/२०११.

।। ठराव ।।

प्रकरण क्र.२१९:- पाणीपट्टी दरात व नविन जलजोडणी शुल्क व इतर दरात वाढ करणेबाबत.
(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ प्रमाणे)

ठराव क्र.१०९ :-

सदरचा विषय फेटाळण्यात येत आहे.

सुचक :- (श्री. भगवती शर्मा)

अनुमोदक :- (श्री. लक्ष्मण संगम)

सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ०७/०२/२०११

प्रकरण क्र.१२० :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० व ९९ अन्वये जाहिरात कराचे दर वाढविणेबाबत.

ठराव क्र. ११० :-

(सदरचा विषय मा. सभापतींच्या आदेशाने तहकुब करण्यात आला.)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती दि. ०१/०३/२०११

प्रकरण क्र. १२१ :- दि. ०७/०७/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. १११:-

दि. ०७/०७/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- **अनुमोदन :-**

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२०११

प्रकरण क्र. :- (१२२) - पुर्नविनियोजन मंजूरी मिळणेबाबत. (आरोग्य विभाग)

ठराव क्र. :- ९७२

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकात्मिक डास नियंत्रण करणे कामी लागणारी डास नाशके, डास अळी नाशके, धुकीकरण करणे कामी औषधे खरेदी करणे कामी तसेच शहरात धुर फवारणी करणे कामी लागणारे पेट्रोल "आरोग्य पेट्रोल/ वाहन दुरुस्ती खर्च" या लेखाशिर्षातुन सदरची तरतुद अपुरी पडत आहे. याकामी खालील नमुना क्र. १० नियम ३० (३) नुसार पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

क्र	लेखाशिर्ष आरोग्य साफ सफाई व सोयी	उपलब्ध शिल्लक	लेखाशिर्ष आरोग्य साफ सफाई व सोयी	प्रस्तावीत वाढीची रक्कम
१	कचरा सपाटी करण/ माती भराव	रु. १९,००,०००/-	एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम	रु. २६,००,०००/-
२	संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान बक्षीस /छपाई	रु. ७,००,०००/-		
३	प्रभाग साफसफाई / नाले सफाई /खोदाई करणे	रु. १५,००,०००/-	आरोग्य पेट्रोल /वाहन दुरुस्ती खर्च	रु. १५,००,०००/-
	एकुण उपलब्ध शिल्लक	**रु. ४१,००,०००/-**	**प्रस्तावित वाढीव खर्च**	**रु. ४१,००,०००/-**

वरीलप्रमाणे उपलब्ध असलेली लेखाशिर्षातील शिल्लक प्रस्तावीत वाढीव खर्च, करावयाच्या रक्कमेसाठी वर नमुद केलेल्या लेखाशिर्षात वर्ग करण्यास हि सभा मंजूरी देत आहे.

सुचक :- श्री. भगवती शर्मा

अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम

सभापती
स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२०११

प्रकरण क्र. १२३ :- हॉटेल, बार, व रेस्टॉरन्टच्या परवाना दराबाबत फेर विचार करणे.

ठराव क्र.993 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध व्यवसाय / उद्योग / आस्थापना करीता परवाना शुल्काचे दर मा. महासभा ठराव क्र. ४८, दि. १०/१०/२००८ अन्वये निश्चित करुन मंजूर केलेले आहेत. याबाबतीत महापालिका क्षेत्रातील हॉटेल, बार, व रेस्टॉरंट असोसिएशनचे पदाधिकारी यांनी दि. १५/१०/२०१० रोजी महापालिकेस निवेदन दिले असून निश्चित केलेले दर इतर महापालिकेच्या दरापेक्षा जास्त आहेत व ते कमी करण्याची विनंती त्यांनी केली आहे. याबाबत इतर महापालिकेचे दर मागविले आहेत. इतर महापालिकेच्या तुलनेत आपल्या महापालिकेचे परवाना शुल्क जास्त आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सुधारीत परवाना शुल्क खालील तक्त्याप्रमाणे करण्यात येत आहेत.

सध्याचे दर			सुधारीत दर		
परवाना व्यवसाय	सध्याचे शुल्क	नुतनीकरण १ वर्षाकरिता शुल्क रु.	परवाना व्यवसाय क्षेत्रफळ	नविन शुल्क रु.	नुतनीकरण १ वर्षाकरिता शुल्क रु.
बार ॲन्ड रेस्टॉरन्ट	१५०००/-	७५००/-	१ ते २० चौ.मिटरपर्यंत	५००/-	२५०/-
५००० चौ. फुटापेक्षा जास्त क्षेत्र असलेले बार ॲन्ड रेस्टॉरन्ट	३००००/-	१५०००/-	२० ते ५० चौ. मिटरपर्यंत	७५०/-	३२५/-
उपहार गृहे, चायनीज सेंटर	५०००/-	२५००/-	५० ते १०० चौ. मिटरपर्यंत	१०००/-	५००/-
५०० चौ. फुटपर्यंत हॉटेल	३०००/-	१५००/-	१०० ते १५० चौ. मिटरपर्यंत	१५००/-	७५०/-
५०१ चौ. फुट पुढील क्षेत्राकरीता हॉटेल	५०००/-	२५००/-	१५० चौ. मिटरपुढे प्रत्येक ५० चौ.मि. क्षेत्रफळास ५५० अधिक फी आकारावी जास्तीत जास्त फी.	१००००/-	मंजूरी देत असुन

वरील प्रमाणे सुधारीत परवाना शुल्क आकारणेस ही स्थायी समिती/सभा/मा. महासभेपुढे निर्णयास्तव ठेवणेस मान्यता देत आहे.

सुचक :- अनुमोदन :-

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचुन कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती सभा
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दिनांक : ०१/०३/२०११.

प्रकरण क्रमांक : (७२४)

ठराव क्रमांक : (७१४)

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकरिता ३९ मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी. टी. एल) वाहन खरेदी निविदेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे अग्निशमन दल हि अत्यावश्यक सेवा असून चोवीस तास कार्यरत असते. आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन दल सुसज्ज राहणे गरजेचे आहे.

मा. महासभा दि. १०/१०/२००८ प्रकरण क्र. ५६ ठराव क्र. ४७ अन्वये अग्निशमन दलातील ४५ मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफॉर्म खरेदीकामी मंजुरी दिली होती. त्यानुसार गठित करण्यात आलेल्या निवड समितीने एकमताने मिरा भाईंदर शहराची भौगोलिक परिस्थितीनुसार ३९ मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी. टी. एल) खरेदी करणेकरिता मंजुरी दिली होती. त्यानुसार दि. ०५/०९/२०१० रोजी जाहीर निविदा सुचना व ई-टेंडरिंगद्वारे निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदर निविदा सुचनेनुसार

१) मे. मेट्झ,

२) मे. इग्नेस ब्रान्टेक्नीक

३) मे. रोझन बॉर यांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.

उपरोक्त निविदाधारकांनी त्यांचे निविदेसोबत सादर केलेले तांत्रिक तपशिल संदर्भिय पत्र क्र ०३ अन्वये मुख्य अग्निशमन अधिकारी, ठाणे यांचे कडून तपासून प्राप्त झाले आहेत. संदर्भ क्र. ०४ अन्वये सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार दि. २४/१२/२०१० रोजी सदर एरिलय लॅडर खरेदी कामी गठीत करण्यात आलेल्या निवड समिती सदस्य मा. शहर अभियंता सो., मा. मुख्यलेखापरिक्षक सो., मा. कार्यकारी अभियंता सो., मा. मुख्य लेखाधिकारी सो., मा. उपायुक्त सो. (अग्नि), यांचे सह झालेल्या बैठकीत एकमताने उपरोक्त निविदाधारकांची दरपत्रके उघडण्याबाबत निर्णय घेण्यात आला त्यानुसार उपरोक्त निविदाधारकांची दरपत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत. सदर निविदाधारकांनी सादर केलेल्या दरानुसार तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे

उपरोक्त निविदाधरकांनी सादर केलेले दर हे युरो डॉलर मध्ये केले आहेत. सदर दराचे मे. मेट्झ व मे. रोझन बॉर यांनी भारतीय चलनातील दरा करिता प्रती युरो रु. ६०/- तर मे. हिग्नेस ब्रान्टेक्नीक प्रती युरो रु. ६२/- याप्रमाणे नमुद केले आहेत. त्यानुसार उपरोक्त निविदाधरकांचे भारतीय चलनाप्रमाणे कराव्यतिरिक्त दर (FOB Price) पुढिल प्रमाणे.

तक्ता क्र. १/

SR.	Company Name	DESCRIPTION	QUANTITY	COST OF EQUIPMENT F.O.B CURRENCY (Euro)	Exchange Rate	Amount In Rupees	Total F.O.B. Price In Rupees (A + B)
1	M/s METZ	(A) SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL) LADDER PLATFORM - 39 Mtrs	1 NO	8,78,273/-	1 Euro = Rs.60/-	5,26,96,380/-	5,26,96,380/-
		(B) SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS)	1 SET			----	
2	M/s EGENES	(A) SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL)LADDER PLATFORM - 39 Mtrs	1 NO	9,01,089/-	1 Euro = Rs.62/-	5,58,67,518/-	5,60,22,518/-
		(B) SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS)	1 SET	2,500/-		1,55,000/-	
3	M/s ROSENBAUR	(A) SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL)LADDER PLATFORM - 39 Mtrs	1 NO	8,61,053.80/-	1 Euro = Rs.60/-	5,16,63,228/-	5,16,63,228/-
		(B) SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS)	1 SET			----	

उपरोक्त नमुद निविदाधारकांनी सदर वाहनाच्या कराबाबत सादर केलेल्या दराचा तपशील पुढिल प्रमाणे

तक्ता क्र. २

SR.	Company Name	DESCRIPTION	QUANTITY	SHIPMENT TO MUMBAI/ INDIA OF COLUMN (1) ITEM CURRENCY (Euro) (A)	CLEARANCE, HANDLING, INDIAN AGENTS COMMISSION, INDIAN TRANSPORT & INSURANCE (Euro) (B)	Total (C=A + B)	Exchange Rate (D)	Total Tax. Price In Rupees (E=C x D)
1	M/s METZ	(A) SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL) LADDER PLATFORM - 39 Mtrs	1 NO	9,200/-	8,965/-	18,165/-	1 Euro = Rs.60/-	10,89,900/-
		(B) SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS)	1 SET					
2	M/s EGENES	(A) SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL)LADDER PLATFORM - 39 Mtrs	1 NO	9,400/-	9,627/- + taxes & duties at actual	19,027/-	1 Euro = Rs.62/-	11,79,674/-
		(B) SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS)	1 SET	(Include in price)	INCLUDED ABOVE			
3	M/s ROSENBAUR	(A) SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL)LADDER PLATFORM - 39 Mtrs	1 NO	9,000/-	8,160/-	17,160/-	1 Euro = Rs.60/-	10,29,600/-
		(B) SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS)	1 SET					

उपरोक्त नमुद तक्ता क्र. १ मध्ये नमुद दरात भारतामध्ये आकारण्यात येणारे कर व इतर अन्य करांचा समावेश नाही. निविदाधारकांनी सादर केलेले दर हे केवळ वाहन भारतामध्ये आयात करे पर्यंत (जे.एन.पी.टी/मुंबई डॉक) मर्यादीत आहेत, त्यामुळे शासनामार्फत आकारण्यात येणारे कर उदा. आयात कर, उत्पादन शुल्क कर, आर.टी.ओ., वाहतूक कर तसेच इतर आवश्यक कर महापालिकेने प्रदान करावयाचे आहेत. तसेच मंजूर दरा एवढी रक्कम लेटर ऑफ क्रेकिट द्वारे स्वतंत्र बँक खाते उघडून त्यामध्ये भरणा करावे लागणार आहे. वरिल सर्व बाबींचा उल्लेख निविदेच्या अटिशर्तीमध्ये करण्यात आलेला आहे. सदर अटिशर्तीनुसार

१) मंजूर दरा एवढे लेटर ऑफ क्रेकिट उघडल्यावर त्यातील ५०% रक्कम अग्रीम देण्यात येणार असुन सदर अग्रीम रक्कम देतेसमयी त्या ५०% रक्कम एवढया रक्कमेची बँक गॅरेंटी स्विकारण्यात येईल.

२) लेटर ऑफ क्रेकिट मधिल ३५% रक्कम वाहन शिपमेंट समयी दयावी लागणार आहे व

३) उर्वरित १५% रक्कम वाहन अग्निशमन दलाच्या ताब्यात मिळाल्यावर अदा करावी लागणार आहे.

४) १५% रक्कम अदा झाल्यावर मंजूर दराच्या १०% एवढी रक्कम सुरक्षा अनामत म्हणुन बँक गॅरेंटी स्वरुपात दोन वर्षांकरिता ठेकेदाराकडुन घेण्यात येईल

५) तसेच सदर वाहनाच्या ॲनुअल मेंटनेंन्स ऑपरेटींग कॉन्ट्रॅक्ट करिता प्रति वर्षाकरिता पुढिल प्रमाणे दर सादर केले आहेत

१) वर्ष पहिले	- रु. ८,१४,४५०/-
२) वर्ष दुसरे	- रु. ५,९०,०७०/-
३) वर्ष तीसरे	- रु. ८,०८,४७०/-
४) वर्ष चौथे	- रु. ७,७७,४१९/-
५) वर्ष पाचवे	- रु. ८,९१,२०४/-

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात लेखाशिर्षक ब सार्वजनिक सुरक्षितता अग्निशमन विभाग या लेखाशिर्षा अंतर्गत नवीन फायर फायटर खरेदी करिता रु. ५.०० कोटी ऐवढी तरतूद करण्यात आली आहे. चालू वर्षात दोन मिनी टेंडर बॉडी बांधणीकामीचे देयक रु. ४९,९३,४३६/- बोलेरो जीपचे देयक रु. ६,४२,०७०.४७/- व अम्बुलन्सचे देयक रु. ७,८२,९२६.२५/- असे एकूण देयक रु. ६४,१८,४३२.७२/- अदा करणेत आले असुन दोन मोठे वॉटर टेंडर बॉडी बांधणीकामीचे देयक रु. ७०,३५,४७०/- अदा करावे लागणार असून वरील तरतूदीतून सदर रक्कम वजा जाता रूपये ३,६५,४६,०९७.२८/- एवढी तरतूद शिल्लक राहणार आहे. त्यामध्ये उर्वरित रक्कम रू. १,५१,१७,१३१/-एवढी जमा करून एकूण रक्कम रूपये ५,१६,६३,२२८/- (वाहनाची मुळ किंमत) अधिक रु. १०,२९,६००/- शिपमेंट चार्जेस, क्लिअरिंग, हँडलिंग, इंडियन एजंट कमिशन, ट्रान्सपोटेशन, इंश्युरंस व अंदाजे रक्कम रू. १,६०,००,०००/- आयात कर, उत्पादन शुल्क कर, आर.टी.ओ., वाहतूक कर तसेच इतर आवश्यक करापोटी लेटर ऑफ क्रेकिट उघडून सदरची रक्कम (अंदाजे रु. ६,७८,०९,९५९/-) त्या खात्यामध्ये जमा करावी लागणार आहे.

तरी अग्निशमन दलाकरिता उपरोक्त वाहन ३९ मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी. टी. एल) खरेदी करीता उपरोक्त दरांपैकी सर्वात कमी दराच्या मे. रोझन बॉर यांच्या निविदेस व उपरोक्त प्रस्तावास हि सभा मान्यता देत आहे, तसेच अंदाजे रक्कम रू. ६,७८,०९,९५९/- एवढे लेटर ऑफ क्रेकिट चे स्वतंत्र खाते उघडण्यास व उर्वरित रक्कमेची येत्या आर्थिक वर्षात तरतूद करणेस, हि मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

सुचक

अनुमोदक

सभापती

ठराव सर्वानुमते मंजूर

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२०११

प्रकरण क्र. १२५ :- महानगरपालिकेच्या पदाधिकारी / अधिकारी / कर्मचारी यांना नव्याने भ्रमणध्वनी सेवा उपलब्ध करुन देणेबाबत.

ठराव क्र.११५-

महानगरपालिकेच्या पदाधिकारी / अधिकारी / कर्मचारी यांना सद्यस्थितीत रिलायन्स कंपनीची भ्रमणध्वनी सेवा पुरविण्यात येत आहे. रिलायन्स कंपनीचे नेटवर्क व्यवस्थितरित्या प्राप्त होत नसल्याने महानगरपालिकेच्या महत्वाच्या कामासंबंधी अधिकारी तसेच पदाधिकारी यांच्यामध्ये समन्वय साधता येत नाही. करिता ज्या मोबाईल कंपनीचे नेटवर्क तसेच सेवा चांगली असेल अशा मोबाईल कंपनीकडून भ्रमणध्वनी सेवा उपलब्ध करुन घेणे अत्यावश्यक आहे. वोडाफोन या कंपनीचे नेटवर्क तसेच सेवा इतर मोबाईल कंपन्यांपेक्षा खुप चांगली आहे. तरी मा. आयुक्त व सभापती स्थायी समिती यांचेशी चर्चा करुन वोडाफोन कंपनीस प्रथम प्राधान्य देऊन त्यांचेशी चर्चा निष्फळ ठरल्यास अन्य मोबाईल कंपनीची भ्रमणध्वनी सेवा पदाधिकारी / अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी उपलब्ध करुन घेणेची कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. प्रकाश शर्मा

अनुमोदक :- श्री. कुलीन पेरेरा

ठराव सर्वानुमते मंजुर
ठराव वाचुन कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती सभा
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२०११

प्रकरण क्र. १२६ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९५ अन्वये "अ" + "क" + "अंध व अपंग" + "महिला बालकल्याण" + "JNNURM" + "P" अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे.

ठराव क्र. ११६

(मा. आयुक्त सो. यांनी मा. सभापती, स्थायी समिती यांना मुळ बजेट सादर केले.)

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२०११

प्रकरण क्र. १२७ :- वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०१०-११ चे सुधारीत व सन २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे.

ठराव क्र. १२७:-

(मा. आयुक्त सो. यांनी मा. सभापती, स्थायी समिती यांना वृक्षप्राधिकरणाचे बजेट सादर केले.)

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२०११

प्रकरण क्र. १२८ :- शिक्षण मंडळ समितीने मंजुर केलेले सन २०१०-११ चे सुधारीत व सन २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे.

ठराव क्र. ११८:-

(मा. आयुक्त सो. यांनी मा. सभापती, स्थायी समिती यांना शिक्षण मंडळाचे बजेट सादर केले.)

मिरा भाईंदर महानगरपालिका
मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२०११

प्रकरण क्र. १२९ :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९७ अन्वये परिवहन सेवेचे सन २०१०-११ चे सुधारीत व सन २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे.

ठराव क्र. १२९ :-

(मा. आयुक्त सो. यांनी मा. सभापती, स्थायी समिती यांना परिवहन सेवेचे बजेट सादर केले.)

226

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२०११

प्रकरण क्र. १३० :- मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (संगणक विभाग) मिरा भाईंदर महानगरपालिका मालमत्ता कर व पाणी पुरवठा विभागासाठीसंगणक प्लेन व प्रिप्रिंटेड स्टेशनरी खरेदी करणे.

(सदरचा विषय मा. सभापतींच्या आदेशाने तहकुब करण्यात आला.)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

227

मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२०११

प्रकरण क्र. १३१ :- <u>मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)</u> मिरा भाईंदर महानगरपालिका मालमत्ता कर व पाणी पुरवठा विभागासाठी संगणक प्लेन व प्रिप्रिंटेड स्टेशनरी खरेदी करणे.

(सदरचा विषय मा. सभापतींच्या आदेशाने तहकुब करण्यात आला.)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.७/०३/२०११

प्रकरण क्र. ~~१२९~~ 132 मा. आयुक्त सो. मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी मा. स्थायी समितीच्या दि.७/०३/२०११ रोजीच्या सभेत सादर केलेल्या सन २०१०/२०११ च्या सुधारित व सन २०११/२०१२ च्या मुळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.

ठराव मा. स्थायी समिती ठराव क्र. ---- 920

मा. आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेले सन २०१०/२०११ चे सुधारित व सन २०११/२०१२ च्या मुळ अंदाजपत्रकास कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल तसेच प्रत्येक विभागांची तपशिलवार माहिती विचारात घेवून मा. आयुक्तांचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ/घट आणि सुधारित अंदाजपत्रकातील वाढ / घट त्यानुसार विभागण्यात आलेला बाबवार खर्च विचारात घेवून सन २०११/२०१२ या वित्तीय वर्षात रक्कम रु.5.35 लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा एकमताने मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

तपशिल	2010/11	2011/12
अंदाजपत्रक 'अ'+'ब'+'क'+ 'वृक्षप्राधिकण' + 'महिला बालकल्याण' + 'अंध व अपंग कल्याण' + 'JNNURM'+ 'P' एकूण जमा	56506.70	94728.14
अंदाजपत्रक 'अ'+'ब'+'क'+ 'वृक्षप्राधिकण' + 'महिला बालकल्याण' + 'अंध व अपंग कल्याण' + 'JNNURM'+ 'P' एकूण खर्च	47381.52	94722.79
अखेरची शिल्लक	9125.18	5.35

सूचक :- (श्री. भगवती शर्मा)

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
मा.स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

अनुमोदक:- (श्री. राजेश म्हात्रे)

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ७/०३/२०११

प्रकरण क्र. ~~१२७~~ 133 मा. आयुक्त सो. मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी मा. स्थायी समितीच्या दि. ७/०३/२०११रोजीच्या सभेत सादर केलेल्या सन २०१०/२०११च्या सुधारित व सन २०११/२०१२ च्या मुळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.

ठराव : मा. स्थायी समिती ठराव क्र. ----९२९

मा. अध्यक्ष, वृक्षप्राधिकरण समिती, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात वाढ/घट करुन रक्कम रु. लाख 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण करण्यास आजची सभा एकमताने मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

तपशिल	2010/11	2011/12
एकूण जमा	224.10	224.10
'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण	128.40	430.90
एकूण खर्च	351.50	654.00
शिल्लक	1.00	1.00

सूचक :- M.M. [illegible]

श्री. मोहन जाधव

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

अनुमोदक :- [illegible]

श्री. राजेश म्हात्रे

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. ७/०३/२०११

प्रकरण क्र. १३४ मा. आयुक्त सो. मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी मा. स्थायी समितीच्या दि. ७/०३/२०११ रोजीच्या सभेत सादर केलेल्या सन २०१०/२०११च्या सुधारित व सन २०११/२०१२ च्या मुळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र. १२२ मा. स्थायी समिती ठराव क्र. ---- १२२

मा. अध्यक्ष, शिक्षण मंडळ समिती, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात वाढ/घट करुन रक्कम रु. ५३५ ४८ लाख 'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण करण्यास आजची सभा एकमताने मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

तपशिल	2010/11	2011/12
एकूण जमा	893.00	1277.48
'अ' अंदाजपत्रकातून हस्तांतरण	126.38	535.48
एकूण खर्च	1019.38	1812.96
शिल्लक	—	—

सूचक :- (श्रीमती सुधा व्यास)

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

अनुमोदक :- (श्री. भगवती शर्मा)

२७२

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. 10/03/२०११

प्रकरण क्र.: ~~१२९~~ 135 मा. आयुक्त सो. मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी मा. स्थायी समितीच्या दि. 10/03/२०११ रोजीच्या सभेत सादर केलेल्या सन २०१०/२०११ च्या सुधारित व सन २०११/२०१२ च्या मुळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.

ठराव क्र.: मा. स्थायी समिती ठराव क्र. ----- 123

मा. परिवहन सभापती, मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम यांनी सादर केलेले सन २०१०/२०११ चे सुधारित व सन २०११/२०१२ च्या मुळ अंदाजपत्रकास कार्यालयीन विवरणपत्रे, अहवाल तसेच प्रत्येक विभागांची तपशिलवार माहिती विचारात घेवून मा. परिवहन सभापतीचे अंदाजामध्ये सुचविलेली उत्पन्नातील अपेक्षित वाढ/घट आणि त्यानुसार विभागण्यात आलेला बाबवार खर्च विचारात घेवून सन २०११/२०१२ या वित्तीय वर्षात रक्कम रु.६.20 लाख इतक्या रक्कमेच्या शिल्लकी अंदाजपत्रकास आजची सभा एकमताने मंजूरी देत आहे अंतिम मान्यतेसाठी मा.महासभेपुढे अर्थसंकल्प सविनय सादर करीत आहोत.

तपशिल	2010/11	2011/12
"महसुली"+"भांडवली""+असाधारण" एकूण जमा	2804.79	1891.60
"महसुली"+"भांडवली""+असाधारण" एकूण खर्च	2802.10	1884.80
अखेरची शिल्लक	2.69	6.20

सूचक :- (श्री. भगवती शर्मा)

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती
मा.स्थायी समिती

अनुमोदक :- (श्री. मोहन जाधव)

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती दि. २४/०३/२०११

प्रकरण क्र. १३६ :- दि. २६/०७/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

ठराव क्र. १२४ :-

दि. २६/०७/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. भगवती शर्मा

अनुमोदन :- श्री. राजेश प्रभो

ठराव सर्वानुमते मंजुर

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती दि. २४/३/२०११

प्रकरण क्र.: (१३७) "महापालिकेच्या येणे रक्कमेच्या वसुलीसाठी स्थावर मालमत्तेची विक्री स्थायी आदेश २०१०" प्रारूप स्थायी आदेश करीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६६ (१)(ब) व (२) अन्वये मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्र.: (१२५)

मिरा भाईंदर महापालिकेच्या येणे रक्कमेच्या वसुलीसाठी स्थावर मालमत्तेची विक्री स्थायी आदेश २०१० तयार करण्यात आलेल्या स्थायी आदेशाच्या मसुदयामध्ये माजी उपसचिव, फ. ब. खान यांनी तपासून त्यात योग्य ते दूरुस्ती व फेरबदल सुचविले आहेत. तरी सदर प्रारूप स्थायी आदेशास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६६ (२) अन्वये ही सभा मंजुरी देत आहे. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६७ अन्वये कायदेशिर कार्यवाही करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. भगवती शर्मा

अनुमोदक :- श्री. शशिकांत पोईर

ठराव सर्वानुमते मंजुर

मिरा भाईदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २४/०३/२०११

प्रकरण क्रमांक (१३८):- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६६(१)(क) अन्वये आयुक्त, मिरा भाईदर महानगरपालिका यांनी तयार केलेले स्थायी आदेश (अग्निशमन)" प्रारुप स्थायी आदेश करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६६(२) अन्वये मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्र. (७२६)

मिरा भाईदर महानगरपालिका अग्निशमन विभागाकरिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६६(१)(क) अन्वये आयुक्त, मिरा भाईदर महानगरपालिका यांनी तयार केलेले स्थायी आदेश (अग्निशमन)" प्रारुप उपविधी करिता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६६(२) अन्वये हि स्थायी समिती सभा सदर प्रारुप स्थायी आदेश करिता मान्यता देत आहे. तसेच कलम ४६७ अन्वये कायदेशीर कार्यवाही करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सुचक:-

श्री. भगवती शर्मा

ठराव सर्वानुमते मंजूरी

अनुमोदक :-

श्री. शशिकांत शेलार

235

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २९/०३/२०११

प्रकरण क्र. १३९ :- घोडबंदर येथील जुन्या शाळा इमारतीतील दोन वर्ग पुढील मुदतीकरिता भाड्याने देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

(सदरचा विषय मा. सभापतींच्या आदेशाने तहकुब करण्यात आला.)

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

236

मा. स्थायी समिती सभा दि. २४/०३/२०११

प्रकरण क्र. (१४०) :- निर्मल एम.एम.आर. अभियान अंतर्गत बांधण्यात आलेल्या शौचालय चालवणाऱ्या सीबीओ ना दर निश्चित करुन देणे.

ठराव क्र. (१२७) :-

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत एम.एम.आर.डी.ए. च्या अनुदानातून एकूण १४५ ठिकाणी स्वच्छतागृह बांधण्याची कामे पूर्ण झाली असून ०७ ठिकाणी कामे सुरु आहेत. सदर बांधलेली स्वच्छतागृह स्थानिक सीबीओ नी चालवावयाची आहेत. सदर सीबीओंनी मासिक मुल्य सदर स्वच्छतागृहाचा वापर करणाऱ्या रहिवाशाकडून प्रति महीना वसूल करावयाचा आहे. सद्यस्थितीत सुरु असलेल्या स्वच्छतागृहाच्या वापराकरीता रु. ३०/- ते रु. ६०/- प्रति कुटुंब प्रति महीना याप्रमाणे सीबीओ मार्फत दर आकारण्यात येत आहेत. काही स्वच्छता गृहाच्या ठिकाणी सीबीओ मार्फत झोपडपट्टीतील भाडेकरु व रहीवाशी यांच्याकडून वेगवेगळे व जास्त दर आकारीत असल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत एम.एम.आर.डी.ए. कडे पत्राने विचारणा केली असता त्यांनी "वस्ती स्वच्छता गृहाची स्वच्छता राखण्यासाठी वस्तीतील रहिवाशांची संख्या आणि सदर शौचालयाचा मासीक खर्च याचा अंदाज घेऊन वस्तीतील रहिवाश्यांकडून प्रति कुटुंब किती फी आकारण्यात यावी याचा निर्णय महानगरपालिकेने घ्यावा" असे कळविलेले आहे.

निर्मल एमएमआर अभियाना अंतर्गत बांधलेल्या वस्ती स्वच्छता गृहाची देखभाल व दुरुस्ती करणाऱ्या सीबीओना भाडेकरू व रहीवाशी यांच्याकडून वगवेगळे दर न घेता एकच दर घेण्याबाबत घेण्याबाबत लेखी कळवावे. तसेच इतर कोणत्याही महानगरपालिकेत सीबीओ मार्फत रु. ३० ते ६० प्रति कुटुंब प्रति महिना यापेक्षा जास्त दर घेण्यात येत नाहीत. तरी मिरा-भाईंदर महानगरपालिकेमध्ये सुध्दा स्वच्छता गृह असलेल्या ठिकाणची रहीवाशांची संख्या, होणारा खर्च यांची माहीती घेउन दर ठरवावे व रु. ६०/- प्रति कुटुंबापेक्षा कुठेही जास्त दर ठेउु नये अशा शौचालयाच्या ठिकाणी सीबीओ तयार नसल्यास सेवाभावी व अनुभव असलेल्या संस्थेमार्फत अर्ज मागवून त्यांना सदर स्वच्छतागृहे चालविण्यास देण्यात यावीत. सदर कामे देताना सर्व प्रथम प्रभागाच्या स्थानिक संस्थाना प्राधान्याने कामे देण्यात यावीत.

सुचक :- श्री. भगवती शर्मा

अनुमोदन :- श्री. चंद्रकांत मोहिते

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

DKV/10-11/DK/T 43

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि. २४/०३/२०११

प्रकरण क्रमांक :- (७४१) निविदांना मंजूरी देणे बाबत.

ठराव क्रमांक :- (७२८)

अ.क्र.	कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव	अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर
१	मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील गटारे / नाल्यावर फायबर झाकणे बसविणे.	रू. ५०,००,०००/-

					मे. गजानन कंन्स्ट्रक्शन		मे. गुरकीरत इंटरप्रायजेस	
SR. NO.	DESCRIPTION	SIZES	QTY	PER	RATE	AMOUNT	RATE	AMOUNT
1.	ITEM NO. 1 Providing / Fixing Fibre Covers (Ultra Polymer alloy cover) with angel frame of various sizes for pedestrian, footpath having load bearing capacity 1.50 to 2.5 tons. Safety factor 1 to 3, having integrated metal frame design to seal and load equally with strong structure, inter locking arrangement with EN Series zinc plated, colour code identification etc. required specification as instructed by Engineer In charge . 1) Fibre Covers With Frame	0.60M x 0.60M	600	NO.	5950	3570000	6750	4050000
2	ITEM NO. 1 Providing / Fixing Fibre Covers (Ultra Polymer alloy cover) with angel frame of various sizes for pedestrian, footpath having load bearing capacity 1.50 to 2.5 tons. Safety factor 1 to 3, having integrated metal frame design to seal and load equally with strong structure, inter locking arrangement with EN Series zinc plated, colour code identification etc. required specification as instructed by Engineer In charge . 2) Fibre Covers With Frame	0.60 M x 0.75M	300	NO.	8899	2669700	9725	2917500

अ.क्र.	कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव	अंदाजित खर्च / ठेकेदाराने सादर केलेले दर
२	मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्मशानभूमीत जळाऊ लाकडे पुरवठा करणे.	

अ.क्र.	कामाचा तपशिल	मे. विशाल ट्रेडींग कं		मे. एम.डी. दावडा		मे. जे.डी. इंटरप्रायजेस	
		परिमाण	दर	परिमाण	दर	परिमाण	दर
१	मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्मशानभूमीत जळाऊ लाकडे पुरवठा करणे.	प्रति कि.ग्रॅम	रू. ३.७०	प्रति कि.ग्रॅम	रू. ३.२५	प्रति कि.ग्रॅम	रू. ४.४५

३	भाईंदर (प.) प्रभाग क्र. ३३ येथिल अंतर्गत रस्त्यावर फुटपाथ करीता पेव्हर ब्लॉक बसविणे व आवश्यक इतर कामे करणे. **(दलित वस्ती सुधारणा योजना)**	रू. ५०,००,०००/-
	१) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन	**१८.०० % कमी दराने**
	२) मे. मुस्कान इंटरप्रायजेस	५.११ % कमी दराने
	३) मे. केदारनाथ कंन्स्ट्रक्शन कं.	१२.०० % कमी दराने
	४) मे. स्टार कंन्स्ट्रक्शन	५.७५ % कमी दराने
	५) मे. चंदना कंन्स्ट्रक्शन	५.०० % कमी दराने
४	भाईंदर (प) जनार्दन रकवी रस्ता उंच करुन डांबरीकरण (पुर्नपृष्ठीकरण) करणे. **(दलित वस्ती सुधारणा योजना)**	रू. ४७,९८,४००/-
	१) मे. गजानन कंन्स्ट्रक्शन	**१५.०० % कमी दराने**
	२) मे. श्रीजी कंन्स्ट्रक्शन	७.०० % कमी दराने
	३) मे. चंदना कंन्स्ट्रक्शन	७.०० % कमी दराने
	४) मे. केदारनाथ कंन्स्ट्रक्शन कं.	५.९९ % कमी दराने

५	प्रभाग क्र. ७५ मधील माशाचा पाडा रोडवरील बस्त्याव डिसोझा वाडीजवळ नाल्यावर आर.सी.सी. स्लॅब ड्रेन बांधणे.	रू. १४,९९,१००/-	मे. जयशिवराय मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
६	मौजे घोडबंदर येथील पॉवर हाउस समोरील रस्त्यालगत गटार बांधणे कामी बांधकाम साहीत्य पुरवठा करणे.	रू. १४,८२,६००/-	मे. दौलत मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
७	भाईंदर (पूर्व) बी.पी. रोडवरील शिव श्रध्दा कॉम्पलेक्स व उडीपी हॉटेल येथील क्रॉस ड्रेन बांधणे.	रू. १४,०३,८००/-	मे. हरीओम मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. पालघर .जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने

८	मिरारोड (पूर्व) विजय पार्क येथील साईयश हॉस्पिटल पासून अंबर हॉल पर्यंतचा उर्वरीत रस्ता व गटार बांधणे.	रू. १५,००,०००/-	मे. शितलादेवी मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. शहापूर, .जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दर
९	रा.म.क्र. ०८ वरील जनतानगर येथील साईकृपा कॉम्पलेक्स मधील उद्यान विकसित करणे.	रू. १५,००,०००/-	मे. रिफ्युजी हरिजन मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर .जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
१०	प्रभाग क्र. ७५ मधील जनतानगर येथील जरीमरी मंदिरा जवळ आर.सी.सी. स्लॅब ड्रेन बांधणे.	रू. १२,६३,८००/-	मे. अनंत मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. उल्हासनगर .जि. ठाणे.	अंदाजपत्रकिय दराने
११	मिरारोड सिता स्वप्न डी, ई, विंग पर्यंत उर्वरीत डी.पी रस्ता व गटाराचे बाधकाम करणे.	रू. १२,९१,८००/-	मे. श्री. साईनाथ कंन्स्ट्रक्शन रा. डी – ३२०, शिवगती अपा, उत्तन रोड भाईंदर (प) जि. ठाणे.	

तरी अ.क्र.१च्या कामी **मे. गजानन कंन्स्ट्रक्शन** यांची वरील दराची निविदा, अ.क्र. २ करीता मे. एम.डी. दावडा यांची वरील दराची, अ.क्र. ३ करीता मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची १८.०० % कमी दराची व अ.क्र. ४ करीता मे. गजानन कंन्स्ट्रक्शन यांची १५.०० % कमी दराची निविदा यांच्या निविदांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र. ५ ते ११ च्या कामी जिल्हामजूर सोसायटीमार्फत शिफारस केलेल्या संस्थाच्या अंदाजपत्रक दरांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) व अनुसुची 'ड' मधील प्रकरण पाच (दोन) (दोन) अन्वये व खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. भगवती शर्मा

अनुमोदन :- सौ. निर्मला सावळे

ठराव सर्वानुमते मंजूर
ठराव वाचून कायम करण्यात आला

सभापती
स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. स्थायी समिती सभा दि.28/3/२०११

प्रकरण क्र. :१४२ मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

ठराव क्र. :- 92 e

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन अहवाल बनविणे व अंमलबजावणी करणे कामी खालीलप्रमाणे खर्च होणार आहे.

क्र.	निविदाकाराचे नांव	कामाचा तपशिल	एकुण देय रक्कम
१	मे. टेंडन ॲन्ड असोसिएट	घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाल बनविणे व अंमलबजावणी करणे.	रु. ९,०१,८७५/-

महापालिका घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाल बनविणे व त्याची अंमलबजावणी करणेचे काम मे. इको सेव सिस्टीम यांना रु. ९,०१,८७५/- देण्यात आले होते. त्यांनी मुदतीत वरील काम समाधानकारक न केल्याने मे. टंडन ॲन्ड असोसिएट यांना महापालिका घनकचरा प्रकल्प अहवाल बनविणे व त्याची अंमलबजावणी करणेचे काम रु. ९,०१,८७५/- देण्यास हि सभा मंजुरी देत आहे.

सुचक :- श्री. भगवती शर्मा

अनुमोदन :- श्री. लक्ष्मण जंगम

सभापती
स्थायी समिती